www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ कपिल पाटील पुन्हा मंत्री, वामन म्हात्रे महापौर होतील... पान ३ वर....



■ नियोजन प्राधिकरणांचे काम आता कंपनीच्या... पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २११ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, सोमवार, ०६ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### भारतीय तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर गुजरात येथे कोसळले, अपघातात ३ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली : भारतीय तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर गुजरातमधील पोरबंदर येथे कोसळले असल्याची घटना दुपारी १२ वाजताच्या दरम्यान ५ जानेवारी २०२५ रोजी घडली. या अपघातामध्ये एकूण ३ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

अपघात झालेले हेलिकॉप्टर हे तटरक्षक दलाचे होते अशी माहिती सांगण्यात आली. यामध्ये तीन क्रू मेंबरचाही समावेश होता. दरम्यान मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर पोरबंदर येथे हेलिकॉप्टरचा अपघात झाला होता. यावेळी चार पैकी एकजण बचावला गेला असून तिघांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर येत आहे. याप्रकरणातील पुढील तापासादरम्यान हेलिकॉप्टरच्या अपघाताचे कारण समोर आले आहे. हेलिकॉप्टरच्या टेक ऑफदरम्यान तांत्रिक बिघाड झाल्यामुळे हेलिकॉप्टर कोसळले आणि त्याचा अपघात झाला.

### माजी खासदार गजानन कीर्तिकर यांच्या पत्नी मेघना कीर्तिकर यांचं निधन



मुंबई - शिवसेना शिंदे गटातील ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार गजानन कीर्तिकर यांच्या पत्नी मेघना कीर्तिकर यांचं आज पहाटे अल्पशा आजारानं निधन झालं. त्या ८२ वर्षांच्या होत्या. मेघना कीर्तिकर ह्या मागच्या काही दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर वांद्रे येथील लीलावती रुग्णालयामध्ये उपचार सुरू होते. उपचारांदरम्यानच आज पहाटे ३.३० च्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. अंत्यदर्शनासाठी त्यांचं पार्थिव आज संध्याकाळी ४ ते ६ या वेळेमध्ये स्नेहदीप, पहाडी रोड नं. २, आरे मार्ग, गोरेगाव (पूर्व) या निवासस्थानी ठेवण्यात येणार आहे.

# विकसित भारतासाठी ग्रामीण भागाचा विकास महत्त्वाचा : नरेंद्र मोदी

● मुंबई, विशाल कारंडे :

**नवी दिल्लीमधील भारत मंडपम्मध्ये शनिवार, दि. ४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ग्रामीण भारत महोत्सव-२०२५'चे उद्घाटन केले. 'ग्रामीण भारत महोत्सव' हा वित्तीय सेवा विभाग आणि नाबार्ड यांचा संयुक्त उपक्रम असून, देशातील ग्रामीण भागातील जनतेचा विकास साधण्याचे उद्दिष्ट ठेवून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.**



"पंतप्रधान मोदी यांनी नवी दिल्लीमधील भारत मंडपम्मध्ये 'ग्रामीण भारत महोत्सव-२०२५'चे उद्घाटन केले. देशातील जेवढी गावे विकसित होतील, विकसित भारतात त्यांची भूमिकाही अधिक व्यापक असेल," असे पंतप्रधान मोदी यांनी उपस्थितीतांना संबोधित करताना म्हटले. तसेच, "ज्यांना कोणीच विचारत नाही, मोदी अशांची पूजा करतात," असेही पंतप्रधानांनी म्हटले. देशातील ग्रामीण भागाचा विकास करत, ग्रामीण भागातील जनतेला एक सन्मानपूर्वक चांगले जीवन देणे हीच माझ्या सरकारची प्राथमिकता असून, यासाठीच माझ्या सरकारने अनेक मूलभूत सुविधांचा विकास करणाऱ्या योजना सुरु केल्या असल्याचेदेखील पंतप्रधान मोदी यांनी म्हटले.

### 'ग्रामीण महोत्सव-२०२५' मध्ये आहे काय?

■ 'ग्रामीण महोत्सव-२०२५'मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची ग्रामीण भागाच्या विकासाबाबत मार्गदर्शनपर भाषणे होणार आहेत. तसेच, कार्यानुभव शिबिरांचेदेखील आयोजन केले आहे. देशातील हातमाग, हस्तकला अशा १८०पेक्षा जास्त कारागिरांच्या वस्तू या ठिकाणी घेता येणार आहेत.

## बीड पोलीस दलात मोठे फेरफार

● बीड, दिगंबर जाधव :



बीड जिल्ह्यातील केज तालुक्यामधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा तपास फार वेगाने सुरू आहे. परंतु, त्यांना लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी राज्यभरात विविध ठिकाणी मोर्चे काढण्यात येत आहेत. या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी नेमण्यात आली आहे. तर, सीआयडी आणि न्यायालयीन चौकशी सुद्धा या प्रकरणी करण्यात येत आहे. या घटनेनंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे तत्कालीन एसपी अविनाश बारगळ यांची बदली केली आणि त्यांच्या जागी नवनीत कावत यांची नियुक्ती केली. कावत यांनी या जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्यापासून चौकशीस सुरुवात केली असून आज रविवारी (ता. ०५ जानेवारी) त्यांनी बीड पोलीस दलामध्ये मोठे फेरफार केले आहेत.

पान २ वर

## राज्याबाहेर एक जरी उद्योग गेला, तर मी तुमची काळजी घेईन - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

● ठाणे, रोहित जैसवाल :

राज्याबाहेर एकही उद्योग यापुढे जाऊ देऊ नका यासाठी काळजी घ्या, अशा स्पष्ट सूचना देत, एक जरी उद्योग राज्याबाहेर गेला तर मग, मी तुमची काळजी घेईन, असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी ठाण्यातील बिझनेस जत्रेत बोलताना उद्योग मंत्र्यांना दिला. ठाणे येथील टिपटॉप प्लाझा येथे लक्षवेध संस्थेच्या वतीने आयोजित बिझनेस जत्रेला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शनिवारी उपस्थिती लावून उपस्थित उद्योजकांना मार्गदर्शन केले. एका उद्योगामुळे अनेक लघु उद्योजकांना काम मिळते. यातून रोजगाराची संधी उपलब्ध होते. यामुळे उद्योग हे राज्यासाठी महत्वाचे आहेत. त्यामुळे अडीच वर्षात काय झाले, याचा विचार सोडा आणि यापुढे एकही उद्योग राज्याबाहेर जाणार नाही, याची काळजी घ्या, अशा सूचना उद्योग मंत्र्यांना दिल्या आहेत.



तसेच एक जरी उद्योग राज्याबाहेर गेला तर मग, मी तुमची काळजी घेईन, असा इशाराही दिल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. महाविकास आघाडी सरकारच्या काळात परकीय गुंतवणूकीत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर होता. मी मुख्यमंत्री झाल्यावर आता परकीय गुंतवणूकित आपले राज्य क्रमांक एकवर आले. पूर्वी उद्योजकाना माझे काय म्हणून विचारले जायचे. आता आम्ही त्यांना तुमचे काय म्हणून विचारतो.असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला. महाविकास आघाडी सरकारमध्ये उद्योग, मंदिर, दुकान, सण, उत्सव बंद होते. सगळे बंद करून चालणार कसे, नुसते करोना करून चालत नव्हते. यामुळेच सर्वसामान्य लोकांच्या मनातील एका विचारधारेचे सरकार स्थापन केले, असेही ते म्हणाले. मागील अडीच वर्षात विविध क्षेत्रात काम झाले. आपले राज्य उद्योगस्नेही राज्य झाले आहे, असेही ते म्हणाले. व्यवसाय कोणताही असो, त्यात प्रामाणिकपणा आणि कष्ट असेल तर शून्यातू विश्व निर्माण होते. संधीचे सोने केले पाहिजे. असे केल्यास त्या व्यक्तीला निश्चित यश मिळते असे मतही त्यांनी व्यक्त केले.

## राज्यात भ्रष्टाचाराचे ७१३ गुन्हे!

■ नाशिकमध्ये सर्वाधिक गुन्हे ! ■ मुंबईत सर्वात कमी गुन्हे !

● मुंबई, राकेश गायकवाड :

लाच घेतल्याप्रकरणी राज्याच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या संख्येत कमालीची घट झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे. यंदा राज्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने भ्रष्टाचारप्रकरणी ७१३ गुन्हे नोंदवले आहेत. नाशिकमध्ये सर्वाधिक तर मुंबईत आश्चर्यकारकरीत्या कमी गुन्हे नोंदवले गेले आहेत. ७१३ पैकी ६७८ गुन्हे प्रत्यक्षात लाच घेतल्याप्रकरणी तर ३१ गुन्हे बेहिशेबी संपत्ती गोळा केल्याप्रकरणी आहेत.

राज्यातील लाचेच्या ६७८ गुन्ह्यांत ९९३ जणांना अटक करुन तीन कोटी १८ लाखांची लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली. यामध्ये सर्वाधिक लाचखोर महसूल विभागातील असून १८० गुन्ह्यांत २५२ जणांना अटक करण्यात आली.



या खालोखाल पोलिसांचा (१३७) क्रमांक लागतो. प्रथम श्रेणीतील ६२, द्वितीय श्रेणीतील १०१ तर तृतीय व चतुर्थ श्रेणीतील अनुक्रमे ५१० व ४७ तसेच इतर १०४ लाचखोरांचा समावेश आहे.

२०१४ मध्ये राज्यात भ्रष्टाचारप्रकरणी १३१६ गुन्हे दाखल झाले होते. तेव्हापासून दरवर्षी गुन्ह्यांच्या संख्येत घट झाली आहे. २०१५ मध्ये १२७९, २०१६ मध्ये १०१६, २०१७ मध्ये ९२५, २०१८ व २०१९ मध्ये अनुक्रमे ९३६ आणि ८९१ गुन्ह्यांची नोंद झाली.

पान २ वर

## महाराष्ट्रातील भिकारी येथे गोळा झालेत, शिर्डीतील मोफत जेवण बंद करा - सुजय विखे



● पुणे, शकील शेख :

शिर्डीतील साई संस्थानच्या प्रसादालयामध्ये मोफत भोजन दिलं जातं. मात्र, आता साई संस्थानच्या प्रसादालयात देण्यात येणारे मोफत जेवण बंद करा आणि जेवणासाठी पैसे घ्या, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे नेते तथा माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी केली आहे. तसेच मोफत जेवणासाठी जे पैसे दिले जातात ते पैसे मुलांच्या आणि मुलींच्या शिक्षणासाठी खर्च केले जावेत, अशी मागणीही सुजय विखे यांनी केली आहे. तसेच 'संपूर्ण देश येथे येऊन फुकट जेवण करतोय, संपूर्ण महाराष्ट्रातील भिकारी येथे गोळा झालेत', असं विधानही सुजय विखे यांनी शिर्डीतील एका कार्यक्रमात बोलताना केलं आहे. त्यांच्या या विधानावरून राजकारण तापण्याची शक्यता आहे. शिर्डी परिक्रमाच्या कार्यक्रमात बोलताना माजी खासदार सुजय विखे म्हणाले की, "साई भक्त आणण्याच्या पार्श्वभूमीवर परिक्रमा हे एक माध्यम आहे. त्यामध्ये दोन्ही गोष्टी साध्य होतात. साई बाबांच्या विचारांची प्रसिद्धी देशभरात होते.

## समृद्ध गावांसाठी खोमारपाडा प्रारूप योजनांच्या मदतीने पालघर जिल्ह्यातील गावाचा सर्वांगीण विकास



● पालघर, सुचिता सोनावणे:

### नंदादीप समृद्ध योजना कशा प्रकारे राबवली जाते?

प्रत्येक कुटुंबाचा आर्थिक स्रोत उंचावण्यासाठी पायाभूत सुविधा वाढविणे, व्यवसायासाठी साधन सामग्री व इतर आवश्यक बाबींची उभारणी करणे, उत्पादनासाठी तांत्रिक साहाय्य व विक्रीसाठी विपणनाची जोड देणे व कुटुंबातील सदस्यांचा जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी मनरेगा योजनेतील उपक्रम इतर विभागाच्या योज़ना अंतर्भूत करण्यात आले आहे. त्यामुळे मर्यादित आर्थिक सहभाग ठेऊन शासकीय योजनांचा लाभ उपभोगता आला.

पालघर जिल्ह्यातील खोमारपाडा (विक्रमगड) गावातील १०८ कुटुंबीयांचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबवून चार- पाच वर्षांत लखपती कुटुंबं झाली आहेत. मनरेगा योजनेतील उपक्रम इतर विभागाच्या सहकार्याने गावातील प्रत्येक कुटुंबाने समृद्धीकडे वाटचाल केली असून गावातील पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण व आर्थिक स्थर उंचाविला आहे. या नंदादीप समृद्ध गावाने आदर्श निर्माण करून इतरांसाठी दिशादर्शक ठरल्याने राज्यभरात खोमारपाडा प्रारूप राबविण्याचे राज्य सरकारने ठरवले आहे. मनरेगाअंतर्गत विविध योजना राबवून खोमारपाड्यातील नागरिकांनी भात शेतीपलीकडे जाऊन दुग्धव्यवसाय, भाजीपाला, रबी शेती, शेततळे व मत्स्यशेती, कुकुटपालन, शेळीपालन, तेलबियांचे लागवड कंपोस्ट व व्हर्मी कंपोस्ट निर्मिती केल्याने १२ महिने गावातच रोजगार उपलब्ध करून दारिद्र्यावर मात केली. दोन वर्षांत या गावाचे एकूण उत्पन्न २.१४ कोटी रुपयांवरून ३.१८ कोटी रुपयांवर पोहोचले. गावातील अनेक कुटुंबांनी दुचाकी व चार चाकी वाहने घेतली आहेत. समृद्ध कुटुंब होण्याकडे वाटचाल करताना या योजनेत मूल्यमापनाचे चार स्तर विचाराधीन घेतले असून सुविधापती पहिल्या टप्प्यात कुपोषणग्रस्त कुटुंबाकडे कुकर, मिक्सर, गॅस सुविधा प्राप्त होणे, दुसऱ्या टप्प्यात रेफ्रिजरेटर, डेटा प्याकसह मोबाइल कुटुंबातील प्रत्येक सदस्य आठव्या इयत्तेपर्यंत शिक्षित असणे, तिसऱ्या टप्प्यात स्वत:ची मोटरसायकल असणे व लखपती कुटुंबाकडे वाटचाल करणे तर सुविधापती टप्पा चारमध्ये स्वत:चे चार चाकी वाहन व कुटुंबाचे वार्षिक लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न घेऊन समृद्ध कुटुंब म्हणून वावरणे असे अपेक्षित आहे.

पान २ वर

## मेट्रोच्या कामांसाठी सुधारित वेळापत्रक करा : मुख्यमंत्री

● मुंबई, विशाल पाटील :



मुंबई शहर आणि उपनगरांतील कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी आणि रस्त्यावरील वाहतुककोंडी कमी करण्यासाठी मुंबई आणि मुंबई उपनगरांत विविध 'मेट्रो' प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. या 'मेट्रो' प्रकल्पांचा आणि मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाच्या माध्यमातून सुरु असणाऱ्या कामांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला. यावेळी त्यांनी 'मेट्रो'ची कामे पूर्ण करण्यासाठी सुधारित वेळापत्रक करण्याचे निर्देश दिले. शनिवार, दि. ४ जानेवारी रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास विभाग (१) चे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त संजय मुखर्जी, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार, अश्विन मुदगल, महामुंबई 'मेट्रो संचलन महामंडळ' व्यवस्थापकीय संचालक रुबल आगरवाल, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक 'मेट्रो' मार्गाचा आढावा घेतला. "सद्यस्थितीत मुंबई उपनगरांत सुरू असलेली सर्व 'मेट्रों'ची कामे पूर्ण होण्याचे वेळापत्रक नव्याने तयार करा. कामांमध्ये विलंब चालणार नाही.

■ 'मेट्रो-३' मुळे २०-२५ किमीची त्यात आणखी भर पडेल, म्हणजेच यंदाच्या वर्षी एकूण ५० किलोमीटरच्या मेट्रोचे जाळे मुंबईत विस्तारेल. इतकेच नाहीतर पुढच्या वर्षीपासून ५० किमी 'मेट्रो' दरवर्षी सुरू होईल, हे सुनिश्चित करा, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमएमआरडीला लक्ष्य दिले.

■ यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंदू मिल येथील 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक' आणि 'हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मारक' यांच्या कामांचा आढावाही घेतला. या दोन्ही प्रकल्पांच्या वार्षिक देखभालीसाठी आराखडा आताच तयार करा, अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. दरम्यान, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त संजय मुखर्जी यांनी प्राधिकरणाच्या माध्यमातून सुरु असलेल्या कामांचे सादरीकरण केले.

पान २ वर

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियमाला उच्च न्यायालयात आव्हान



● पुणे, अभिजित येरल्लू :

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आंदोलन, सभा किंवा निदर्शने आयोजित करण्यासाठी आठ दिवस आधी परवानगी घेण्याबाबत लागू केलेल्या नव्या नियमाला युवक काँग्रेसकडून मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसर, अहिल्यानगर आणि नाशिक उपकेंद्र येथे कोणत्याही स्वरूपाच्या सभा, बैठका, आंदोलने आणि तत्सम कार्यक्रम करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाची किमान आठ दिवस आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. पूर्वपरवानगी न घेता सभा, बैठका, कार्यक्रम घेतल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे परिपत्रक विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांनी नुकतेच प्रसिद्ध केले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत चर्चा करून हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाला उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील याचिकेवरील निर्णयाचा संदर्भ देण्यात आला होता. मात्र, या निर्णयावर मोठी टीका करण्यात आली, आंदोलनही करण्यात आले. या पार्श्वभूमीवर, आयएलएस विधी महाविद्यालयातील विद्यार्थी अविनाश सोळुंके, युवक काँग्रेसच्या प्रसारमाध्यम विभागाचे अध्यक्ष अक्षय जैन यांनी विद्यापीठाच्या निर्णयाला उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आव्हान दिले आहे. 'विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीच्या हक्कांवर हा निर्णय थेट आघात करतो. हा नियम म्हणजे विद्यार्थ्यांचा आवाज गप्प करण्याचा प्रयत्न आहे.

पान २ वर

## संपादकीय

### पर्यावरण राखायचे असेल, तर गरजा मर्यादित ठेवाव्याच लागतील!

आजमितीला अवघे जग हवामान अरिष्टाच्या गर्तेत असून केव्हा, कुठे आणि कशा स्वरूपाच्या आपत्तीस सामोरे जावे लागेल याचा नेम नाही! दररोज कुठे न कुठे भुस्खलन, भूकंप, चक्रीवादळे, हिमनद्या वितळणे, उष्णतेच्या लाटा, वणवे, अवर्षण व साधना सामोरे जावे लागते. होय, पूर्वी यापैकी काही उत्पात होत होते. मात्र, अलीकडे त्यांची व्याप्ती, वारंवारिता व उग्रता कैकपटींनी वाढली आहे. क्षणार्धात होत्याचे नव्हते होते. मुख्य म्हणजे हे उत्पात निसर्गाचा कोप नसून मानवाने निसर्गात केलेल्या अविवेकी व अवाजवी हस्तक्षेपाचा परिणाम आहे.जेव्हा आपण मानवनिर्मित आपत्ती म्हणतो तेव्हा सर्व लोक नव्हे तर सत्ताधीश, धनदांडगे धोरणकर्ते यास जबाबदार आहेत, हे निःसंदिग्धपणे अधोरेखित केले पाहिजे. ऋतूचक्रात विघाड, निसर्गाचे असंतुलन निसर्गचक्रात बाधा येणे यामुळे हवामान बदलाची समस्या ओढवली आहे. यास मुख्यतः कारणीभूत आहे कोळसा, तेल व नैसर्गिक वायू या जीवाश्म इंधनाचा प्रचंड वापर. त्यामुळे होणारे कबं व अन्य विषारी वायूंचे उत्सर्जन. अर्थात हे संकट संपूर्ण पृथ्वीस्तरावर असून यास मुख्यतः जबाबदार आहेत आजवर जीवाश्म इंधनाचा भरमसाठ वापर करत आलेले विकसित देश ! त्यामुळे प्रूषणाला ऐतिहासिकदृष्ट्या विकसित राष्ट्रे जबाबदार असली, तरी सध्या चीन सर्वाधिक उत्सर्जन करणारा देश आहे. दुसरा क्रमांक अमेरिकेचा तर तिसरा क्रमांक भारताचा आहे. विशेष म्हणजे भारत जगात सर्वाधिक तेल आयात करतो. सध्या आपण दरवर्षी २२ लाख कोटी रुपये इंधन आयातीसाठी खर्च करतो. भारताच्या उत्सर्जनात ४० टक्के वाटा वाहतुकीचा आहे. हे लक्षात घेता भारताने मोटारवाहन उद्योगास दिलेले प्रोत्साहन पूर्णतः चुकीचे आहे. रेल्वे व जलवाहतूक हेच आपले मुख्य प्रवासी व मालवाहतुकीचे साधन होते, असलेही पाहिजे. १९९० पर्यंत या दोन्हीत रेल्वेचा वाटा ७० टक्के होता. मात्र, आज रस्ते वाहतूक हे मुख्य साधन झाले आहे, यामुळे इंधनखर्च तर वाढलाच. सोबतच पर्यावरणाची अतोनात हानी होत आहे. व्यक्तिगत वापराचे मोटारवाहन हा सरळ सरळ सामाजिक व पर्यावरणीय अपराध मानावा इतकी ही गंभीर बाब आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी काही म्हटले तरी इथेनॉल व वीजवाहने हा काही शाश्वत पर्याय नाही! अन्न पिकांऐवजी शेत जमिनीचा वापर इंधननिर्मितीसाठी करणे पर्यावरणीयदृष्ट्या विनाशकारी आहे. आज मानवजातीवर ओढवलेल्या हवामान अरिष्टाचे कूळमूळ जी निसर्ग विध्वंसक श्रमिकांचे शोषण करणारी जीवाश्म इंधनप्रधान ऊर्जा, वाहतूक औद्योगिकीकरण व शहरीकरणाची विकासप्रणाली व जीवनशैली सुरवातीला पाश्चिमात्य जगाने स्वीकारली आणि आज जिचे अवघ्या जगातील सत्ताधीश अट्टहासाने अंधानुकरण करत आहेत, ती जीवनशैली हेच आहे. या संदर्भात बुद्ध-महावीरांपासून गांधीपर्यंत सर्व भारतीय तत्वचिंतक तसेच थोरो, रस्कीन व टॉलस्टाय सारखे अन्य जगभरचे तत्वज्ञ मानवजातीला जे सांगत होते त्याचे मर्म अस्तित्व संकटाच्या संदर्भात लक्षात घेणे नितांत गरजेचे आहे. १९७२ पासून संयुक्त राष्ट्रांच्या वतीने पर्यावरण प्रश्नावर परिषदा होत असून २०१५ साली पॅरिस येथे झालेल्या कॉप- २१ परिषदेने प्रमुख जागतिक नेत्यांच्या उपस्थितित सर्व संमतीनेतापमानवाढ १.५ अंश सेल्सियसवर सिमित ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. त्यानंतर नऊ वर्षांनी बाकू येथे नुकत्याच झालेल्या परिषदेत हे समोर आले की ती मर्यादा ओलांडली जात आहे. खचितच ही चिंतेची बाब असून पृथ्वी होरपळत असताना सत्ताधीश त्यांच्या 'विकास खेळात ' मश्गुल आहेत. भरीस भर हवामान बदलास थोतांड मानणारे ट्रम्प यांची दुसऱ्यांदा अमेरिकेच्या अध्यक्षपदी निवड झाली. देशोदेशींचे वैज्ञानिक टाहो फोडून हे बजावत आहेत. सत्ताधिशांनो, सर्वनाशापासून वाचण्यासाठी विज्ञान व वैज्ञानिकांचे तरी ऐका, उपभोग माफक व मर्यादित असल्याखेरीज स्रोत सर्वांना पुरणार नाहीत. खरंतर आजच्या नफेखोर बाजारव्यवस्थेने अनाठायी उपभोगाला जे मोकळे रान दिले ते निसर्ग व मानवाच्याही अस्तित्वाला बाधक आहे. निसर्गाशी तादात्म्य राखत जगण्याचा जो अहिंसक मार्ग गांधीजींनी आधुनिक जगाला दाखवला त्यापासून योग्य तो बोध घेऊन सादगी, स्वालंबन, स्वदेशीचा मार्ग जगाने स्वीकारला तर हवामान अरिष्टावर मात करता येईल, याविषयी तिळमात्र शंका नसावी. खेदाची बाब आहे की बुद्ध गांधीचा भारत आज पाश्चिमेचे अंधानुकरण करण्यास विकास मानतो एवढेच नव्हे तर पर्यावरण म्हणजे विकासाला व्यत्यय मानून अमेरिका, रशिया व चीनच्या पावलावर पाऊल ठेवत 'विकसित भारताकडे प्रस्थान करत आहेत.

## आजची चित्रोळी



नर सांबरा शिंगे असती
मादी सांबर बिनशिंगाचे !
जशी मानवा दाढी असते,
कसब जाणा ओळखण्याचे !!

मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# ब्रह्मपुत्रा नदीवर चीनचे जगातील सर्वांत मोठे धरण



भारत-चीन संबंधांमध्ये सातत्याने चढउतार राहिला आहे. कुरापतखोर राहिलेल्या एक पाऊल मागे आल्यानंतर पाऊल कधी आणि केव्हा आणि कसे गिळंकृत केले याचाही अंदाज येत नाही आणि आजवर आलेला सुद्धा नाही. ऑक्टोबरमध्ये रशियाच्या कझान शहरात पीएम मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय संबंध सुधारण्यासाठी बैठक झाली. चीनसोबतचे संबंध सुधारण्याबाबत परराष्ट्रमंत्र्यांनी संसदेत वक्तव्यही केले. यानंतर एनएसए अजित डोवाल चीनला गेले. अवघ्या काही महिन्यांमध्ये परिस्थितीमध्ये फरक पडेल, अशी चर्चा होती. मात्र, चीनने पुन्हा एकदा या सर्व प्रयत्नांना कात्रजचा घाट दाखवला आहे.

**होटन प्रांतात दोन नवीन काऊंटीची घोषणा**

आता लडाखमध्ये दोन काउंटी (परगणा) निर्माण करून चीन आता ब्रह्मपुत्रा नदीवर जगातील सर्वात मोठे धरण बांधण्याच्या चीनच्या तयारीत आहे. ज्यांनी 'एक पाऊल मागे आणि दोन पावले पुढे जाणे' हा चीनच्या विस्तारवादी धोरणाचा भाग असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. चीनने नुकतेच होटन प्रांतात दोन नवीन काऊंटी निर्माण करणार असल्याची घोषणा केली होती. त्याचा काही भाग लडाखमध्ये आहे. चीनच्या या पावलावर भारताने टीका करत हे पाऊल स्वीकारता येणार नाही असे म्हटले आहे. हा भाग भारताचा आहे आणि चीनचा येथे दावा पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

**भारतीय सीमेजवळ धरण बांधण्याच्या तयारीत**

चीन तिबेटजवळ ब्रह्मपुत्रा नदीवर भारतीय सीमेजवळ धरण बांधण्याच्या तयारीत आहे. २५ डिसेंबर रोजी चीनने याला मान्यता दिली आहे. जगातील सर्वात मोठे धरण म्हणून वर्णन यांची गणना केली जात आहे. या प्रकल्पाची किंमत सुमारे १४० अब्ज डॉलर्स अपेक्षित आहे. चीनच्या या तयारीला भारताने विरोध केला आहे. यानंतर चीनने खुलासा केला असला, तरी तो तोकडा आहे. ब्रह्मपुत्रेवरून भारत आणि चीनमध्ये वाद होण्याची ही पहिलीच घटना नाही. ब्रह्मपुत्रेवरून जगातील दोन सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशांमधील जलयुद्धाला कारणीभूत ठरत चालली आहे.

**ब्रह्मपुत्रा जगातील ९ वी सर्वात मोठी नदी**

ब्रह्मपुत्रा नदी तिबेटमधील कैलास पर्वताजवळील मानसरोवर सरोवरातून उगम पावते आणि भारतातील अरुणाचल प्रदेश आणि आसाममधून बांगलादेशात जात बंगालच्या उपसागराला मिळते. आसाममध्ये ती ब्रह्मपुत्रा किंवा लुईत म्हणून ओळखली जाते, तिबेटमध्ये तिला यारलुंग त्सांगपो म्हणून ओळखली जाते, अरुणाचलमध्ये ती सियांग/दिहांग नदी म्हणून ओळखली जाते आणि बंगालीमध्ये ती जमुना नदी म्हणून ओळखली जाते. प्रवाहाच्या बाबतीत ही जगातील ९ वी सर्वात मोठी नदी आहे आणि १५ वी सर्वात लांब नदी आहे.

**ब्रह्मपुत्रा नदी विशेष का आहे?**

ब्रह्मपुत्रा नदी भारत, चीन आणि बांगलादेशसाठी वरदान आहे. ही नदी सिंचन आणि वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. पण हिमालयीन प्रदेशात बर्फ वितळला की पूर येतो. अनेक उपनद्या त्यात सामील होतात. ब्रह्मपुत्रा नदी जगातील दोन सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारत आणि चीनमधून जाते आणि बांगलादेशला मिळते. त्याची तुलना जगाच्या एकूण लोकसंख्येशी केली तर असे म्हणता येईल की ही २९०० किमी लांबीची नदी जगातील ३७ टक्के लोकसंख्येला प्रभावित करते. त्यामुळे यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे.

**लोकसंख्या हे देखील वादाचे प्रमुख कारण**

भारत आणि चीनची लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या ३७ टक्के असूनही, या दोन देशांत एकत्रितपणे जगातील केवळ ११ टक्के शुद्ध पाणी आहे. जलप्रदूषण आणि औद्योगिक अर्थव्यवस्थांच्या वाढत्या मागण्यांमुळे ही विसंगती आणखी वाढली आहे. पाण्याबाबत चीनच्या अस्वस्थतेचे एक कारण म्हणजे त्याची अंदाजे २३ दशलक्ष लोकसंख्या पिण्याच्या स्वच्छ पाण्याच्या समस्येला तोंड देत आहे. चीनच्या अनेक भागात विजेचे संकटही सामान्य आहे. त्यामुळे जलविद्युत प्रकल्प ही चीनची मजबुरी आहे. चीनच्या सरकारी आकडेवारीनुसार, चीनचे सुमारे ६० टक्के भूजल दूषित आहे. चीनच्या १२ व्या पंचवार्षिक योजनेत असे मानले जात होते की जलस्रोतांच्या कमतरतेमुळे देशाच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होत आहे.

दुसरीकडे, नद्या भारतासाठी जीवनवाहिन्या आहेत. देशातील मोठी लोकसंख्या नद्यांशी थेट जोडलेली आहे. जर आपण ब्रह्मपुत्रा नदीबद्दलच बोललो तर ती भारताच्या ईशान्य प्रदेशासाठी वरदान आहे. अहवालांवर विश्वास ठेवला तर, एकट्या आसाममधील २७ दशलक्ष लोकसंख्येला या नदीचा फायदा होतो. या नदीला सांस्कृतिक आणि पौराणिकदृष्ट्याही खूप महत्त्व आहे. वीजनिर्मिती आणि मासळीसाठीही ही नदी महत्त्वाची आहे. सामरिकदृष्ट्याही ब्रह्मपुत्रा भारतासाठी खूप महत्त्वाची आहे.

**ब्रह्मपुत्रा नदीचा वाटा कोणत्या देशात किती आहे?**

ब्रह्मपुत्रा नदीची एकूण लांबी सुमारे २९०० किमी आहे. ज्यामध्ये ते चीनच्या हद्दीत सुमारे १७०० किमी वाहते आणि नंतर अंदाजे ९१६ किमीपर्यंत भारताच्या सीमेमध्ये वाहते. त्यानंतर तिस्ता नदीला जाऊन उरलेले भाग बांगलादेशच्या सीमेखाली येतात. २५ डिसेंबर रोजी चीनने तिबेटमधील यारलुंग त्सांगपो (ब्रह्मपुत्रा) नदीवर जगातील सर्वात मोठ्या जलविद्युत प्रकल्पाच्या बांधकामाला मंजुरी दिली. हा ६०,०० मेगावॅट (MW) क्षमतेचा प्रकल्प जगातील सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प असलेल्या थ्री गॉर्जेस धरणापेक्षा तिप्पट वीज निर्मिती करेल. मात्र यावर भारताने प्रश्न उपस्थित केले आहेत.

**यामुळे भारताचे काय नुकसान होईल?**

या प्रकल्पाच्या बांधकामामुळे ईशान्य भारतातील लाखो लोकांच्या जीवनमानावर आणि पर्यावरणावर परिणाम होऊ शकतो. चीनच्या या प्रयत्नावर अनेक पर्यावरणवाद्यांनी आधीच चिंता व्यक्त केली आहे. चीनच्या या निर्णयाला भारतानेही कडाडून विरोध केला आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता यांनीही प्रश्न उपस्थित केला आहे. चीनने हे मोठे धरण बांधल्याने नजीकच्या इतर नद्यांवर विपरीत परिणाम होईल, असा युक्तिवाद केला जात आहे. भारतात येणाऱ्या पाण्याचा प्रवाह कमी होईल.

**यारलुंग त्सांगपो प्रकल्प म्हणजे काय?**

अहवालानुसार, चीनच्या १४ व्या पंचवार्षिक योजनेत (२०२१-२०२५) या प्रकल्पाचा उल्लेख करण्यात आला होता. हे 'ग्रेट बेंड' जवळ आहे, जिथे ब्रह्मपुत्रा नदी अरुणाचल प्रदेशात प्रवेश करण्यापूर्वी मेडोग काउंटीमध्ये जवळजवळ यू-टर्न घेते.

**या प्रकल्पाबाबत चीनचा दावा काय आहे?**

चीनचा दावा आहे की हा प्रकल्प पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांपासून दूर जाऊन २०६० पर्यंत नेट कार्बन न्यूट्रॅलिटी प्राप्त करण्यास मदत करेल. ब्रह्मपुत्रा नदीचा प्रवाह या परिस्थितीसाठी आदर्श असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. चीन या धरणाचा वापर केवळ जलविद्युतसाठीच करणार नाही, तर त्याचा वापर शस्त्र म्हणूनही केला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, दोन देशांमधील तणाव वाढल्यास चीन या धरणातून भारताच्या सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणात पाणी सोडून पूरसदृश परिस्थिती निर्माण करू शकतो. ब्रह्मपुत्रा नदीवरील या प्रस्तावित धरणाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरही चिंता व्यक्त करण्यात आली. भारताचाही निषेध होत आहे. याआधी चीनने हुबेई प्रांतातील यियांग शहरात यांगत्से नदीवर 'थ्री गॉर्जेस डॅम' बांधला होता. या धरणामुळे आजूबाजूच्या परिसरावर गंभीर पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम झाले. या धरणामुळे १ दशलक्षहून अधिक लोक विस्थापित झाले आणि भूकंपासारख्या समस्या या प्रदेशात सामान्य झाल्या.

त्याच वेळी, चीन ज्या ठिकाणी ब्रह्मपुत्रा नदीवर धरण बांधण्याच्या तयारीत आहे, ती जागा हिमालयीन प्रदेशात येते. तिथे आधीच भूकंपाचा धोका जास्त आहे.

ब्रह्मपुत्रा नदी किंवा तिच्याशी संबंधित नद्यांवर चीनने यापूर्वीच अनेक प्रकल्प सुरू केले आहेत. १९९८ मध्ये चीनने सर्वप्रथम यमद्रोक जलविद्युत केंद्र सुरू केले. यानंतर २००७ मध्ये झिकाँग हायड्रो पॉवर स्टेशन, त्यानंतर २०१३, २०१५ मध्ये जंगमू धरण, २०१९ आणि २०२० मध्ये विविध प्रकल्प सुरू करण्यात आले. तसेच, १० हून अधिक प्रकल्प अद्याप प्रस्तावित आहेत. भारताबद्दल बोलायचे झाले तर अरुणाचल प्रदेशात सुबनसिरी धरण सुरू झाले. मात्र सध्या हे काम बंद आहे. तर रंगनदी धरण २००१ मध्ये बांधण्यात आले आणि रंगीत धरण २००० मध्ये बांधण्यात आले. त्याचवेळी दिबांग धरणाच्या दुसऱ्या प्रकल्पाचे कामही रखडले आहे.

## पान १ वरून...

### बीड पोलीस दलात मोठे फेरफार

बीड पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी पोलीस दलातील चार अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीडचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. ज्यामुळे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशान्वये या प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले. परंतु, पोलीस अधीकक्षक कावत यांनी सक्तीच्या रजेवर असलेल्या प्रशांत महाजन यांची सुद्धा बदली केली आहे. महाजन यांची नियुक्ती आता नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे. प्रशांत महाजन हे केज पोलीस स्टेशनचे निरीक्षक होते, मात्र आता त्यांच्या जागी वैभव पाटील यांची बीड पोलीस निरीक्षक, प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर, पोलीस निरीक्षक सय्यद मजहर अली अबू तालीब हे नियंत्रण कक्षातून आता परळी ग्रामीण पोलीस स्टेशनचा पदभार घेणार आहेत. तसेच, पोलीस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे यांची केज पोलीस स्टेशनमध्ये बदली करण्यात आली आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आतापर्यंत 07 जणांना बेड्या ठोकण्यात आलेल्या आहेत. परंतु, या प्रकरणातील आणखी एक आरोपी असलेला कृष्णा आंधळे हा अद्यापही बेपत्ता आहे. त्यामुळे त्याला लवकरात लवकर अटक करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. पण दुसरीकडे मात्र, या हत्या प्रकरणात नेमण्यात आलेल्या एसआयटीबाबत विरोधकांकडून अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. कारण या एसआयटीमधील काही अधिकारी हे वाल्मीक कराडला नमस्कार करणारी लोक आहेत, असा दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. तर या एसआयटीमध्ये असलेले पीएसआय महेश विघ्ने आणि मनोजकुमार वाघ यांचे वाल्मीक कराड यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध असल्याचा आरोप शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

### राज्यात भ्रष्टाचाराचे ७१३ गुन्हे!

२०२० मध्ये करोना काळात गुन्हे नोंद होण्यात कमालीची घट झाली. त्यावेळीही ६६३ गुन्हे नोंदवले गेले. २०२१ मध्ये ७७३, २०२२ मध्ये ७४९ तर गेल्या वर्षी २०२३ मध्ये ८१२ गुन्ह्यांची नोंद झाली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावर ही माहिती उपलब्ध आहे.नाशिकमध्ये सर्वाधिक १५२ गुन्ह्यांची नोंद झाली असून या अंतर्गत २३४ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. त्या खालोखाल पुण्याचा क्रमांक लागतो. पुण्यात १४९ गुन्ह्यांत २२३ जणांविरुद्ध प्रत्यक्ष लाचप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. मुंबईत भ्रष्टाचाराचे फक्त ३९ गुन्हे नोंदवून ५४ जणांना अटक करण्यात आली. ठाणे (७३), नागपूर (६२), अमरावती (६८), संभाजीनगर (११२) या शहरात एकूण ४१९ जणांना अटक करण्यात आली.

### समृद्ध गावांसाठी खोमारपाडा प्रारूप...

फळबाग लागवड, मजगी, जुनी भात शेती दुरुस्ती, शेततळे, अस्तरिकरण, नाडेप- व्हर्मी कंपोस्ट, फुलशेती, घरकुल कामे, सिंचन विहीर, विहीर पुनर्भरण, वैयक्तिक शौचालय, कुकुटपालन, गायगोठा तयार करणे, शेळीशेड तयार करणे तलावातील गाळ काढणे, रस्ते, वृक्ष लागवड व संगोपन, मैदान सपाटीकरण, ग्रामपंचायत भवन बांधणे, दगडी नाला बांधकामे, गाळ काढणे, वनतळे, जलशोषक, तुटक समतल चर खोदणे, रोपवाटिकाखोमारपाडा येथील शिक्षक बाबू मोरे यांच्या पुढाकाराने गावातील नागरिकांचे प्रबोधन करून त्यांचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर रोखण्यासाठी मनरेगाच्या विविध योजनांची अंमलबजावणी टप्प्याटप्प्यांत करण्यात आली. सद्या:स्थितीत चार-पाच भूमिहीन कुटुंबांव्यतिरिक्त सर्व कुटुंबीय शेती व शेतीपूरक व्यवसाय यशस्वीपणे करत असून ही कुटुंबं लखपती झाली आहेत. – नंदकुमार, मिशन महासंचालक, मनरेगा

यशदा प्रशिक्षण केंद्र पुणे येथे प्रशिक्षणार्थी म्हणून मी सहभागी झालो. यावेळी राज्यातील ७० सरपंच उपस्थित होते. एक आदर्श गाव म्हणून प्रशिक्षक खोमरपाडा येथील प्रगतीचे, स्थलांतर थांबवून वाढलेले उत्पन्न यांचे सादरीकरण करत होते. हे ऐकून या गावचा सरपंच म्हणून मला अभिमान वाटला. – विलास गहला, सरपंच, खोमारपाडा

### मेट्रोच्या कामांसाठी सुधारित वेळापत्रक करा :...

अनेक ठिकाणी कारशेडशिवाय 'मेट्रो' सुरु होत आहेत. त्यामुळे 'मेट्रो' सुरु करण्यासाठी त्यासाठी थांबू नका. जगात असे प्रयोग होत आहेत, त्याचा अभ्यास करा. भविष्यातील सर्व संभाव्य 'मेट्रो' प्रकल्पांचा आढावा घेत, त्यासाठी कारशेडसाठी जागा आतापासूनच आरक्षित करा," असे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना दिले. तसेच यंदाच्या वर्षात २२ किमी 'मेट्रो' सुरु करण्याचे निर्देशदेखील मुख्यमंत्र्यांनी दिले.

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियमाला...

तो मागे घेण्यासाठी न्यायालयात दाद मागितली आहे,' असे जैन यांनी सांगितले. 'हा नियम विद्यार्थ्यांच्या तत्काळ प्रतिक्रिया देण्याच्या अधिकारावर गदा आणणारा आहे. राज्यघटनेने दिलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि आंदोलन करण्याचा हक्क या निर्णयामुळे धोक्यात आला आहे. त्यामुळे कायद्याच्या मार्गाने या निर्णयाविरोधात लढा देण्यासाठी, विद्यार्थ्यांना त्यांचे अधिकार परत मिळवून देण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली आहे,' असे सोळुंके यांनी नमूद केले. दरम्यान, विद्यापीठाच्या परिपत्रकाविरोधात न्यायालयात याचिका दाखल झाल्याची माहिती मिळालेली नाही. माहिती मिळाल्यावर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी स्पष्ट केले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www. lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# मनपा कचरा ट्रकच्या धडकेत सात वर्षीय मुलाने गमावला पाय

उल्हासनगर (विवेक गुंजाळ) : उल्हासनगर महापालिकेचा कचरा वाहून नेणाऱ्या एक ट्रकने चीरडल्याने एका सात वर्षीय मुलाला आपला पाय गमवावा लागला आहे. उल्हासनगरच्या कॅम्प पाच भागात गायकवाडपाडा येथे उल्हासनगर पालिकेची कचराभूमी आहे. त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणावर ट्रकची वाहतूक सुरू असते. ही कचराभूमी बंद करावी अशी स्थानिकांची गेल्या अनेक वर्षांपासून मागणी आहे.



उल्हासनगर शहराचा कचरा प्रश्न वर्षानुवर्षे कायम आहे. काही वर्षांपूर्वी उल्हासनगर पालिकेने आपली खेमानी परिसरातील कचरा भूमीची क्षमता संपल्याने कॅम्प पाच भागात खदान परिसरात कचरा टाकण्यास सुरुवात केली होती. या भागात आकाश कॉलनी, गायकवाड पाडा परिसरात लोकवस्ती आहे. सुरुवातीला कचऱ्याची क्षमता कमी असल्याने विशेष त्रास जाणवला नाही. मात्र कालांतराने इतर कचराभूमीप्रमाणे इथेही कचऱ्याला आग लागणे, पावसाळ्यात दुर्गंधी सुटणे आणि यातून दुर्गंधी सांडपाणी वाहण्याचे प्रकार सुरू झाले. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास जाणवू लागला. त्यामुळे ही कचराभूमी बंद करावी अशी मागणी वाढू लागली. या कचरा भूमीचा प्रश्न थेट राष्ट्रीय हरित लवादाकडे पोहोचला. लवादाने त्यावर कारवाईचे आदेशही पालिका प्रशासनाला दिले होते. मात्र ही कचारभुमी बंद होऊ शकली नाही. शनिवारी नियमितपणे या कचरा भूमीवर आलेल्या एका ट्रकने शेजारी खेळत असलेल्या गणेश चव्हाण या सात वर्षीय मुलाला धडक दिली. यावेळी ट्रक या मुलाच्या पायावरून गेला. त्यामुळे या मुलाला पाय गमवावा लागला. अपघातानंतर ट्रक चालक फरार झाला. चालक शुद्धीवर नव्हता असा आरोप यावेळी नागरिकांनी केला. अपघातानंतर संतप्त नागरिकांनी ट्रक रोखला. तर ही कचरा भूमी बंद करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

### आरोग्याचा प्रश्नही गंभीर

■ गेल्या काही वर्षात या कचरा भूमीमुळे आसपासच्या परिसरात रोगराई पसरण्याच्या तक्रारी नागरिक करत आहेत. इथून निघणारी दुर्गंधी, दूर यामुळे श्वसनाचे आजार बळावले आहेत. या कचराभूमीला सातत्याने आग लागते. पालिका प्रशासन ती आग तात्काळ विझवते. मात्र त्यावर कायमस्वरूपी तोडगा निघालेला नाही. पालिकेने ही कचरा भूमी अनधिकृतरित्या तयार केली आहे. नागरी लोकवस्तीच्या शेजारी कचराभूमी तयार करणे चुकीचे असून हा अमानवीय प्रकार असल्याची तक्रार आता नागरिक करत आहेत.

# खडकपाडा पोलिसांनी आदिवासी पाड्यावर समजावले शिक्षणाचे महत्त्व

कल्याण (आकाश कांबळे): खडकपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ अमरनाथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली खडकपाडा पोलीस स्टेशन हद्दीतील कातकरी पाडा वाडेघर या आदिवासी पाड्यावर खडकपाडा पो स्टे कडून भेट दिली. तेथील लहान मुलांना एकत्र करून त्यांना व त्यांच्या पालकांना साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण बाकले यांनी पोलीस रेझिंग डे बाबत माहिती दिली आणि शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले.



आपल्यालाही सरकारी अधिकारी व्हायचे असेल आमच्यासारखे पोलीस व्हायचे असेल तर तुम्हाला शिक्षण घ्यावे लागेल व पालकांनाही मुलांना नेहमी शाळेत पाठवण्याबाबत सुचित करण्यात आले. त्याकरता कोणतीही मदत लागल्यास खडकपाडा पो स्टे शी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले. यावेळी सर्व लहान मुलांना खडकपाडा पो स्टे च्यावतीने खाऊचे बॉक्स वाटप करण्यात आले. पहिल्यांदा पोलीस आदिवासी वस्तीत येऊन खाऊचे वाटप केल्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. पालकांनीही आम्ही जास्तीत जास्त मुलांना शाळेत पाठऊ व त्यांना शिकवण्याचा प्रयत्न करू असे सांगितले.

# ब्राह्मण घटकांकडून विविध समाज विकासाचे कार्य

## कल्याणमधील ब्राह्मण सभेच्या कार्यात ब्राह्मण आमदारांचे मत



कल्याण (विवेक गुंजाळ): ब्राह्मण घटकांकडून केवळ ज्ञाती विकासापुरते काम न करता विविध स्तरातील समाजाच्या विकासासाठी काम केले जात आहे. ज्ञाती प्रश्न, नागरी, विकासाची कामे करताना जात, पात, धर्म न पाळला जात नाही. या दूरगामी विचारातून समाज विकासाबरोबर राष्ट्र विकास साधला जाणार आहे. त्या दिशेने देशाची पावले पडत आहेत, अशी मते रविवारी येथील ब्राह्मण सभा कल्याण शाखेतर्फे आयोजित ब्राह्मण समाजातील नवनिर्वाचित आमदारांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली. ब्राह्मण सभा कल्याण शाखेतर्फे विधानसभा निवडणुकीत राज्यातून विविध मतदारसंघातून निवडून आलेल्या ब्राह्मण ज्ञातीमधील आमदारांच्या सत्काराचा कार्यक्रम अत्रे रंगमंदिरात आयोजित केला होता. यावेळी सज्जनगड येथील श्री रामदास स्वामी संस्थानचे भूषण महारुद्रस्वामी महाराज, भाजपचे आमदार संजय केळकर, बोरिवलीचे आमदार संजय उपाध्याय, सांगलीचे आमदार सुधीर गाडगीळ, राजापूरचे आमदार किरण सामंत, परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशीष दामले, आमदार कुमार आयलानी, भाजप नेते माधव भांडारी, ब्राह्मण सभेचे अध्यक्ष मुकुंद बापट, उपाध्यक्ष पंकज दांडेकर, सचिव प्रसाद काणे, अॅड. सुरेश पटवर्धन आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

सर्व समाज, राष्ट्र विचार समोर ठेऊन ब्राह्मण लोकप्रतिनिधी, ब्राह्मण संस्था काम करत आहेत. या सर्व कामांमध्ये राष्ट्र विचाराला प्रथम प्राधान्य आहे. परशुराम आर्थिक विकास मंडळाला शासनाने २०० कोटीचा निधी देऊन या माध्यमातून ज्ञाती विकासासाठी विविध कार्यक्रम राबविणे शक्य होणार आहे. स्वबुध्दी सामर्थ्यावर ब्राह्मण समाज वाटचाल करत आहे. दुर्बल घटक, इतर समाज घटकांच्या विकासासाठीही तितकाच तत्पर आहे, असे आमदार केळकर यांनी सांगितले. आरक्षणाच्या मागे न धावता ब्राह्मण ज्ञाती समाज बुध्दी सामर्थ्याने प्रगती करत आहे. ही प्रगती करत असताना तो राष्ट्र, समाज विकासाला प्राधान्य देत आहे, असे आमदार उपाध्यये यांनी सांगितले. श्री भूषण स्वामी महाराज यांनी समर्थ रामदास स्वामी यांनी बलोपसनेबरोबर मनोपसनेची रुजवण समाजात केली. यामधून एकसंध समाज उभा राहिला.

# कपिल पाटील पुन्हा मंत्री, वामन म्हात्रे महापौर होतील - वन मंत्री गणेश नाईक

बदलापूर (गणेश बागडे) : गुणी लोकप्रतिनिधींच्या मागे उभे राहणे माझे काम आहे. तसेच ज्यांच्यात धमक असते ते कधीही माजी होत नाहीत. कपिल पाटील हे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते, ते जिल्हा बँकेचे अध्यक्ष झाले, खासदार झाले केंद्रीय मंत्री झाले. भविष्यातही ते पुन्हा खासदार आणि केंद्रीय मंत्री होतील. तसेच शिवसेनेचे वामन म्हात्रे हे बदलापूरचे महापौर होतील, असे भाकीत राज्याचे नवनियुक्त वनमंत्री गणेश नाईक यांनी केले आहे. भाजपचे कोकण शिक्षण मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त नाईक बदलापूर शहरात आले होते. त्यानिमित्त नाईक यांनी माध्यमांशी संवाद साधताना ही भाकित केली. गेल्या काही महिन्यात बदलापुरात शिवसेना विरुद्ध भाजपचे



काही नेते तसेच भाजप विरुद्ध भाजप नेते असा वाद सुरू आहे. त्यात नाईक यांचे वक्तव्य महत्त्वाचे मानले जाते.

भाजपाचे कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्ताने महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेच्या वतीने ठाणे जिल्ह्यातील शाळांचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर गुणवंत कर्मचाऱ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत बदलापूर येथे झालेल्या कार्यक्रमाला माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील हेदेखील उपस्थित होते. यावेळी दोघांनी आमदार म्हात्रे यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी दोन्ही नेत्यांनी म्हात्रे बंधूंवर स्तुती सुमाने उधळली. वनमंत्री गणेश नाईक यांनी माध्यमांशी बोलताना आपण वामन म्हात्रे आणि कपिल पाटील यांच्या पाठीशी उभे आहोत असे स्पष्ट केले. गुणी व्यक्तींच्या मागे उभे राहणे माझे काम आहे असे सांगत नाईक यांनी वामन म्हात्रे आणि कपिल पाटील यांचे समर्थन केले. तसेच कपिल पाटील भविष्यात पुन्हा खासदार आणि केंद्रात मंत्री होतील अशी ही आशा त्यांनी व्यक्त केली. सोबतच बदलापूर महापालिका झाल्यानंतर वामन म्हात्रे त्याचे महापौर होतील असाही दावा नाईक यांनी केला. गणेश नाईक यांच्या या वक्तव्यानंतर बदलापुरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

गेल्या काही महिन्यात बदलापूर आणि मुरबाड विधानसभा तसेच भिवंडी लोकसभा मतदारसंघात महायुतीमध्ये अनेक राजकीय संघर्ष उभे राहिले आहेत. लोकसभेपासून माजी खासदार कपिल पाटील आणि मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांच्यात संघर्ष सुरू आहे. पराभवानंतर कपिल पाटील कथोरे यांच्यावर टीका करण्याची एकही संधी सोडत नाहीत. तर कथोरे यांनीही विधानसभेच्या विजयानंतर आपण आता माजी लोकप्रतिनिधींना आजी होऊ देणार नाही असे जाहीर केले होते. तर शिवसेनेचे वामन म्हात्रे यांनाही कथोरे यांनी इशारा दिला होता. त्यानंतर विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने कपिल पाटील आणि वामन म्हात्रे एकत्र आल्याचे चित्र दिसते आहे. त्यातच शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्याचे वनमंत्री गणेश नाईक उपस्थित होते. त्यांनीही आपण म्हात्रे आणि पाटील यांच्या पाठीशी असल्याचे स्पष्ट केल्याने आता हा स्थानिक संघर्ष कोणत्या दिशेला जातो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# गायमुख ते भाईंदर २० हजार कोटींच्या प्रकल्पासाठी पाच कंपन्या मैदानात

मीरा-भाईंदर (सतीश सोनावणे) : मीरा-भाईंदर ते ठाणे प्रवास जलद करण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या गायमुख ते भाईंदर या २० हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पाच्या कामासाठी पाच कंपन्यांनी १० निविदा दाखल केल्या आहेत. या प्रकल्पाच्या कामासाठी एमएमआरडीएने जुलैमध्ये काढलेल्या निविदेला कंपन्यांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे लवकरच कंत्राटदार अंतिम करून कामाला सुरुवात केली जाणार आहे.




घोडबंदर रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी गायमुख ते भाईंदर हा १५.५ किमीचा मार्ग उभारण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. त्यानुसार भाईंदर ते फाउंटन हॉटेल, असा १० किमी लांबीचा उन्नत मार्ग उभारला जाणार असून, हा मार्ग दोन्ही दिशांच्या वाहतुकीसाठी प्रत्येकी ४ लेनचा असेल. त्यासाठी सुमारे ८५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. तर फाउंटन हॉटेल ते गायमुख असा ५.५ किमीचा रस्ता उभारला जाणार आहे. त्यातील ३.५ किमीचा दुहेरी भुयारी मार्ग आहे. यात दोन्ही दिशांच्या वाहतुकीसाठी प्रत्येकी तीन मार्गिकांचे दोन स्वतंत्र बोगदे खोदले जातील. त्यापुढे सुमारे २ किमीचा उन्नत रस्ता असेल. त्यासाठी ११,५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. 'एमएमआरडीए'ने १० किमीच्या उन्नत मार्गासाठी आणि फाउंटन हॉटेल ते गायमुख या ५.५ किमीच्या भुयारी मार्गासाठी स्वतंत्र निविदा काढल्या होत्या. या दोन्ही प्रकल्पांसाठी प्रत्येकी पाच कंपन्यांनी निविदा भरल्या आहेत. मीरा-भाईंदर येथून ठाण्याकडे जाताना मोठ्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. गुजरात आणि उत्तर भारतातून येणारी अवजड वाहने या रस्त्यावर येत असल्याने कोंडीत भर पडते. त्यातून घोडबंदर फाउंटन ते घोडबंदर रस्त्यावर वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे.

### भाईंदर ते फाउंटन हॉटेल १० किमी लांबीचा उन्नत मार्ग

■ अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर, एल अँड टी, मेघा इंजिनिअरिंग, नवयुगा इंजिनिअरिंग, ऋत्विक प्रोजेक्ट

### फाउंटन हॉटेल ते गायमुख भुयारी आणि उन्नत मार्ग

■ अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर, एल अँड टी, मेघा इंजिनिअरिंग, नवयुगा इंजिनिअरिंग, ऋत्विक प्रोजेक्ट

# मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघातात



## दोघांचा मृत्यू, दोन जखमी

डहाणू (सुचिता सोनावणे): मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर धानीवरी गावच्या हद्दीत आज दुपारी (५ जानेवार) दुपारी झालेल्या प्रवासी वाहनाच्या भीषण अपघात झाला असून यामध्ये दोन ज्येष्ठ नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. उद्योगपती सायरस मिस्त्री यांच्या अपघाती निधनाप्रमाणेच वाहनाच्या मागच्या आसनावर बसणाऱ्या या प्रवाशांनी सीट बेल्ट घातला नसल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे दिसून आले आहे. डहाणू तालुक्यातून कडून गुजरात कडे दुपारी एक वाजल्याच्या सुमारास निघालेल्या वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे वाहन रस्त्याच्या खाली उतरून कडेला असलेल्या खड्ड्यात कोसळले. वाहनाचा वेग जास्त असल्यामुळे वाहन खड्ड्यात पडल्यानंतर २ ते ३ वेळा उलटून ५० मिटर लांब फेकले गेले आहे.

अपघाता दरम्यान वाहनाच्या पुढच्या बाजूला बसलेल्या पती-पत्नीने सीट बेल्ट लावल्याने ते जखमी झाले असून वाहनाच्या मागच्या आसनावर बसलेले व्याही (पती व पत्नी यांचे वडील) रमलाबेन आरीवाला आणि अमृतलाल घिवाला या दोन ज्येष्ठ नागरिकांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात चालक व त्याची पत्नी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर कासा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सायरस मिस्त्री यांच्याप्रमाणेच दोघांचे अपघाती निधन ४ सप्टेंबर २०२२ रोजी एका आलिशान गाडीमधून गुजरात येथून मुंबईकडे परतताना सायरस मिस्त्री यांच्या वाहना ने चारोटी जवळील सूर्या नदीच्या पुलाच्या कठड्याला जोरदार धडक दिली होती. या अपघात समयी गाडीमध्ये मागच्या आसनावर बसलेल्या सायरस मिस्त्री व जहांगीर पांडोल हे अपघाता दरम्यान आपटले गेल्याने त्यांच्या जागीच मृत्यू झाला होता.

# जुन्या कसारा घाटात अपघात, वाहनांच्या रांगा

शहापूर (विशाल कारंडे) : मुंबई नाशिक महामार्गावरील जुन्या कसारा घाटात रविवारी कंटेनर उलटल्याने आणि मालवाहू ट्रक रस्त्यात बंद पडल्याने वाहतुक कोंडी झाली होती. या वाहतुक कोंडीमुळे रविवारी सुट्टी निमित्ताने बाहेर पडलेल्या नागरिकांचे हाल झाले. अवघ्या १० ते १५ मिनीटांचे अंतर पार करण्यासाठी वाहन चालकांना सुमारे पाऊण तास लागत होता.



जुना कसारा घाट येथील झिरो पॉईंट वळणावर रविवारी पहाटे एक कंटेनर उलटला. त्यातच एक मालवाहू ट्रक रस्त्यात बंद पडल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. या मार्गावर वाहतुक एकेरी मार्गिकेने संथ गतीने सुरू होती. सकाळी १० वाजेपर्यंत जुन्या कसारा घाटातील वाहतूक कोंडी सुटली नव्हती. त्यामुळे कोंडी सोडविताना पोलिसांच्या नाकी नऊ आले होते. काही बेशिस्त वाहन चालकांनी विरुद्ध दिशेने वाहने चालविण्यास सुरूवात केल्याने कोंडीत भर पडली.

दरम्यान, आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी जव्हार फाटा येथे पोहचले. त्यांनी महामार्ग पोलिसांच्या मदतीने हलकी वाहने पर्यायी रस्त्याने वळविली. शहापूर उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे यांनी कसारा पोलिसांना सूचना केल्यानंतर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सुनील गावीत यांच्या पथकाने परिसरात वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न केले. दुपारी १२ नंतर येथील वाहतुक कोंडी सुरळीत झाली.

## मीरा बनली हेमा, ‘इलू इलू’ चित्रपटात दिसणार हटके अंदाजात

आपल्या अभिनयाने आणि सौंदर्याने कायम चर्चेत राहणारी बिग बॉस मराठी गाजवणारी अभिनेत्री मीरा जगन्नाथ आता हेमा बनून प्रेक्षकांच्या काळजाचा ठोका चुकवायला सज्ज झाली आहे. हेमाचा बोल्ड अँड ब्युटीफुल अंदाज आपल्याला आगामी ‘इलू इलू’ या मराठी चित्रपटात दिसणार आहे. मीराचं दिलखेचक पोस्टर सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. फाळके फिल्म्स एण्टरटेन्मेंट प्रॉडक्शन आणि अजिंक्य बापू फाळके दिग्दर्शित ‘इलू इलू’ ३१ जानेवारीला प्रदर्शित होणार आहे. आजवरच्या माझ्या भूमिकांपेक्षा वेगळी भूमिका मला ‘इलू इलू’च्या निमित्ताने करायला मिळाली याचा आनंद असून हेमा देसाई ही व्यक्तिरेखा मी स्वतः खूप एन्जॉय केली. पूर्णपणे नवं असं काहीतरी करून दाखवण्याचा माझा प्रयत्न होता. हेमा देसाई या भूमिकेच्या निमित्ताने मला ती संधी मिळाल्याचे मीरा सांगते. २०१३ मध्ये ‘मिकी व्हायरस’ या चित्रपटाद्वारे हिंदीत दाखल झालेल्या एली अवरामने आजवर ‘किस किस को प्यार करूं’, ‘नाम शबाना’, ‘पोस्टर बॉईज’, ‘बाझार’, ‘मलंग’, ‘कोई जाने ना’, ‘गुडबाय’ या हिंदी चित्रपटांसोबतच तमिळ आणि कन्नड चित्रपटांमध्येही अभिनय केला आहे. ‘इलू इलू’ या मराठी चित्रपटात एली मिस पिंटो या मुख्य भूमिकेत झळकणार आहे. पण ही व्यक्तिरेखा यशस्वीपणे साकारण्यासाठी एलीनं खूप मेहनत घेतली आहे. ‘इलू इलू’ चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद नितीन विजय सुपेकर यांचे आहेत. निर्माते बाळासाहेब फाळके आणि हिंदवी फाळके तर सहनिर्माते यश मनोहर सणस आहेत.



## नावीन्य लोपलेला खेळ! स्क्विड गेम २

श्रीमंतांची मौज होते आणि सामान्यांचा जीव जातो... कोरियन वेबमालिका ‘स्क्विड गेम’ पाहताना याचा पदोपदी प्रत्यय येतो. ‘स्क्विड गेम’चे पहिले पर्व प्रेक्षकांनी डोक्यावर घेतल्यानंतर दुसरे पर्व नेटफ्लिक्सवर नुकतेच प्रदर्शित झाले. पहिल्याच पर्वात अमाप अपेक्षा उंचावलेल्या प्रेक्षकांना दुसऱ्या पर्वात मात्र फारसं काही नवीन सापडलेलं नाही. कोरियाने युद्धानंतर अनेक आर्थिक, सामाजिक स्थित्यंतरे पाहिली आहेत. युद्धझळ बसलेली कुटुंबं, डबघाईला आलेली अर्थव्यवस्था, गरिबी, बेरोजगारी आणि या सगळ्याच्या कचाट्यात सापडलेला देश याचे प्रतिबिंब तिथल्या सिनेमात प्रकर्षाने उमटते. सामाजिक उतरंड, गरीब-श्रीमंतांमधली खोल दरी आणि त्यातून आलेली माणसांची अगतिकता, तरीही परिस्थितीशी लढण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती यांचे चित्रण केलेले कोरियन सिनेमे, वेबमालिका प्रेक्षकांवर गारुड करतात. ‘पॅरासाइट’ हा सिनेमाही अशाच सामाजिक दरीवर आधारलेला होता.



त्यानंतर दोन वर्षांनी करोनाच्या लाटेतून वाट काढत ‘स्क्विड गेम’ ही वेबमालिका नेटफ्लिक्सवर आली आणि प्रेक्षकांनी तिला अक्षरशः डोक्यावर घेतले. ती सर्वाधिक पाहिली गेलेली वेबमालिका ठरली. युद्धानंतर गेल्या सहा-सात दशकांत दक्षिण कोरियात औद्योगिकीकरणाचा वेग वाढला. हुकमशहा सत्तेत आले. विकासाची फळे सर्वदूर पोहोचली नाहीत, त्यामुळे दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या संख्येत प्रचंड वाढ होत गेली. आत्महत्यांचे प्रमाण वाढले, लोक कर्जात बुडून नैराश्यात जाऊ लागले. हे सर्व विस्ताराने सांगण्याचं कारण म्हणजे पैशांची खरी किंमत काय हे तेथील या वर्गापेक्षा अधिक कोणाला ठाऊक नसावं आणि म्हणूनच ज्यांच्या हाती अमाप पैसा असे मूठभर विरुद्ध हा गरीब, पिचलेला वर्ग हा संघर्ष अत्यंत परिणामकारक पद्धतीने या मालिकेत येतो. गरिबांना कर्जमुक्तीचे आमिष दाखवत लहान मुलांचे खेळ खेळवून त्यात हरणाऱ्यांना जिवानीशी मारून मजा लुटणारा श्रीमंत वर्ग ही संकल्पनाच पहिल्या पर्वासाठी अनोखी होती, त्यामुळे प्रेक्षकांनी ती डोक्यावर घेतली. पण पहिलं पर्व तुफान लोकप्रिय ठरल्यानंतर दुसऱ्या पर्वात ती लोकप्रियता कायम ठेवण्याचं आव्हान निर्मात्यांपुढे होतं. उत्कंठा टिकवून ठेवण्यासाठी लागणारं नावीन्य दुसऱ्या पर्वात मात्र हरवलेलं दिसतं. पहिल्या पर्वात सेओंग गि हून हा नायक (अभिनेता ली जंग जे) हा जीवघेणा खेळ जिंकतो, त्यानंतर तीन वर्षांनंतरचं कथानक दुसऱ्या पर्वात आहे. गि हून पुन्हा या खेळात प्रवेश करतो, पण यावेळी तो खेळाच्या आयोजकांचा बीमोड करण्याच्या उद्देशाने आलेला असतो. सात भागांच्या दुसऱ्या पर्वात प्रेक्षकांची दर एक भागात उत्कंठा कायम असली तरी पहिले पर्व पाहिलेल्यांसाठी नावीन्य संपलेलं आहे. त्यामुळे पहिल्या पर्वाच्या पराकोटीच्या यशानंतर दुसऱ्या पर्वाकडून त्याच पटीत अपेक्षा वाढवून ठेवलेल्या प्रेक्षकांचा काहीसा भ्रमनिरास झाला आहे. दुसऱ्या पर्वात पुन्हा खेळ सुरू झाल्याने उत्कंठा कायम ठेवण्यात निर्माते, दिग्दर्शक ह्वांग डोंग-ह्युकची झालेली दमछाक दिसून येते. समाजातल्या भेदाभेदांना अधिक धार चढविण्यासाठी यात समलिंगी पात्र आणले आहे. शिवाय, दुसरे पर्व अधिक रक्तरंजित आहे. मात्र पैशांची निकड आणि हाव, जगण्याची आणि मृत्यूचीही भीती, उमेद, आकांक्षांचे चढउतार प्रभावीपणे मांडण्यात दुसरे पर्वही यशस्वी ठरले.

## तेजस देऊस्करांच्या ‘देवमाणूस’ साठी सुबोध भावे ऑनबोर्ड

तेजस देऊस्कर दिग्दर्शित ‘देवमाणूस’ या बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या दिग्गज कलाकारांच्या टीममध्ये आता अभिनेता सुबोध भावे देखील सामील झाला आहे. अभिनेता सुबोध भावे, महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे या दिग्गज कलाकारांसोबत यंदा स्क्रीन शेअर करणार आहे. त्यामुळे हा चित्रपट एक मल्टिस्टारर चित्रपट असणार आहे, यात शंका नाही. आकर्षक आणि उच्च दर्जाचं नाटक संपूर्ण महाराष्ट्र आणि बाहेरील प्रेक्षकांना आकर्षित करेल आणि अनुभवायला मिळेल. बालगंधर्व, आणि डॉ. काशिनाथ घाणेकर, कट्यार काळजात घुसली, यांसारख्या चित्रपटांतील अविस्मरणीय अभिनयासाठी प्रसिद्ध असलेला अभिनेता सुबोध भावे, ज्याची प्रचंड फॅन फॉलोविंग आहे. जो नेहमी आपल्या प्रत्येक भूमिकांसाठी स्वतःला झोकून देतो. कॉम्प्लेक्स, स्टेबल यांसारख्या विविध लेवलची पात्रं साकारण्याच्या त्यांच्या क्षमतेबद्दल त्याचं अनेकदा कौतुक झालं आहे. त्याचा हा समावेश आणि योगदान नक्कीच चित्रपटाच्या कथेला एक नवं आयाम देईल.देवमाणूसच्या कलाकारांसोबत सामील होण्याबद्दल अभिनेता सुबोध भावे यानं बोलताना सांगितलं की, “मला यापूर्वी दिग्गज अभिनेता महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे या दोघांसोबत स्वतंत्रपणे चित्रपटात काम करण्याचा बहुमान मिळाला आहे, पण देवमाणूसमध्ये पहिल्यांदाच त्यांच्यासोबत एकत्र काम करणं, हा खरोखरच माझ्यासाठी एक रोमांचक अनुभव आहे. या अविश्वसनीय चित्रपटाचा एक भाग होण्यासाठी मी खूप उत्साहित आहे आणि आमचे सामूहिक प्रयत्न पाहून प्रेक्षकांकडून कसा प्रतिसाद मिळतो, हेसुद्धा पाहण्यासाठी मी आतूर आहे.” दरम्यान, देवमाणूस या चित्रपटाचे इतर तपशील जरी गुपित असले तरी, चित्रपटाच्या निर्मात्यांनी आधीच एक प्रकारची कास्टिंगची माहिती देऊन निश्चितच या सिनेमासाठी प्रेक्षकांची आवड निर्माण केली आहे.



## धनंजय पोवारचा मजेशीर व्हिडीओ चर्चेत!

‘बिग बॉस मराठी’च्या पाचव्या पर्वामुळे धनंजय पोवार आणि अंकिता वालावलकर ही भावा-बहिणीची जोडी महाराष्ट्राच्या घराघरांत लोकप्रिय झाली. या दोघांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. शोमध्ये अंकिता धनंजयला ‘डीपी दादा’ म्हणायची. आता ‘बिग बॉस’ संपून अनेक महिने उलटून गेल्यावरही या दोघांची मैत्री कायम आहे. अंकिताच्या घरी सध्या तिची लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. डीपी दादा सुद्धा आपल्या बहिणीच्या लग्नासाठी प्रचंड उत्सुक आहेत. गेल्या काही दिवसांपासून अंकिता लग्नानिमित्त विविध ठिकाणी शॉपिंग करत असल्याचं पाहायला मिळत आहे. तिचा सगळा वेळ धावपळीत जात असल्याच्या अनेक इन्स्टाग्राम स्टोरी ती शेअर करत असते. या सगळ्यात धनंजयने शेअर केलेल्या एका खरेदी करतानाच्या व्हिडीओने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. धनंजय पोवारने अंकिताबरोबरचा एक मजेशीर व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. यामध्ये ‘कोकण हार्टेड गर्ल’ कपड्यांची खरेदी करत असताना, डीपी दादा जमिनीवर बसून तिची वाट बघत असल्याचं पाहायला मिळत आहे. या व्हिडीओला डीपीने, “जेव्हा आपली बहीण खरेदी करत असते... कपडे खरेदी करायला गेल्यावर सकाळी ११ वाजल्यापासून रात्री ११ वाजले तरी आम्हाला सोडत नव्हती” असं मजेशीर कॅप्शन दिलं आहे.धनंजयने हा मजेशीर व्हिडीओ शेअर करत ‘बहिणीची शॉपिंग’ असं म्हटलं होतं. पण, अंकिता म्हणते, “खरेदी वहिनींसाठी होती ते पण सांगा... बायकोच्या खरेदीला तोंड वाकडं केलं. कल्याणी वहिनी बघा जरा...” यावर डीपीने “लाव भांडणं तू” असं उत्तरं दिलं आहे. दरम्यान, डीपी आणि अंकिताच्या या मजेशीर व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. तर, या व्हिडीओला अवघ्या दोन दिवसात २० लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. यावरुन या दोघांची क्रेझ स्पष्टपणे दिसून येते.




## लीला, शिवा व सरूचा भन्नाट डान्स

पडद्यावर दिसणारे कलाकार सध्या सोशल मीडियाच्या माध्यमातूनदेखील प्रेक्षकांच्या भेटीला येताना दिसतात. अनेकदा हे कलाकार त्यांच्या आयुष्यातील खास, महत्त्वाचे, सुंदर क्षण चाहत्यांबरोबर शेअर करत असतात. काही वेळा डान्स, विनोदी रील्स, नवनवीन ठिकाणचे व्हिडीओ अशा माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करत असतात. पडद्यावर दिसणाऱ्या कलाकृतीला जितका प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळतो, तितकाच प्रतिसाद सोशल मीडियावरील या कलाकारांच्या कंटेंटला मिळताना दिसतो. आता ‘नवरी मिळे हिटलरला'मालिकेतील लीला व सरू तसेच ‘शिवा'मालिकेतील शिवा या तिघींनी एकत्र एक डान्स केला असून हा व्हिडीओ त्यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे.अभिनेत्री वल्लरी विराजने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये



वल्लरीसह अभिनेत्री पूर्वा कौशिक व भूमिजा पाटील दिसत आहे. या तीन अभिनेत्रींनी इश्क चित्रपटातील ‘मिस्टर लोवा लोवा’ या गाण्यावर डान्स केला आहे. हा व्हिडीओ शेअर करताना वल्लरीने हे खूप दिवसांपासून बाकी होते, अशा आशयाची कॅप्शन दिली आहे. याबरोबरच अभिनेत्री भूमिजा पाटील व पूर्वा कौशिकला टॅग केले आहे. या व्हिडीओवर चाहत्यांसह सहकलाकरांनीदेखील कमेंट करत या अभिनेत्रींचे कौतुक केले आहे.

## बॉयफ्रेंड 'शिखू'ला सोबत घेऊन जान्हवी कपूर देवदर्शनाला



बॉलिवुड जगतातील सुप्रसिद्ध अभिनेत्री जान्हवी कपूर नेहमीच चर्चेत असते. तिने आतापर्यंत अनेक सुपरहिट चित्रपटांत काम केलंय. विशेष म्हणजे ती सोशल मीडियावरही चांगलीच सक्रिय असते. आपल्या चाहत्यांना जान्हवी तिच्या आयुष्यात नेमकं काय चाललंय, या बाबत अपडेट्स देत असते. दरम्यान, जान्हवी कपूर थेट आंध्र प्रदेशमदील तिरुपती मंदिरात देवदर्शनला पोहोचली आहे. देवदर्शनाला जातानाचे तिचे काही फोटो आणि व्हिडीओ समोर आले आहेत. विशेष म्हणजे या देवदर्शनाला जाताना जान्हवीसोबत तिचा कथित बॉयफ्रेंड शिखर पहाडियादेखील होता. जान्हवी कपूर तिच्या कथित बॉयफ्रेंड शिखर पहाडियासोबत आंध्र प्रदेशमध्ये भगवान व्यंकटेशाच्या दर्शनाला गेली होती. मंदिरात जाताना तिने जांभळ्या रंगाचा पारंपरिक ड्रेस परिधान केला होता. दोघेही यावेळी खूप गोड दिसत होते. देवदर्शनादरम्यानचे त्यांचे काही फोटो समोर आले आहेत. जान्हवी कपूरने जांभळ्या रंगाची साडी तसेच जांभळ्या रंगाच ब्लाऊज परिधान केला आहे.

## माधुरी दीक्षितच्या २४ वर्षांपूर्वीच्या सुपरहिट गाण्यावर पाकिस्तानी अभिनेत्रीचा डान्स!

बॉलीवूड गाण्यांची क्रेझ केवळ भारतातच नव्हे तर जगभरात आहे. विशेषत: ९० च्या दशकातली आणि २००१ ते २०१५ दरम्यानची बॉलीवूड गाणी सर्वत्र विशेष लोकप्रिय आहेत. या गाण्यांनी सिनेप्रेमींच्या मनावर एक वेगळी जादू निर्माण केली आहे. माधुरी दीक्षित, कतरिना कैफ, शाहरुख खान, करिश्मा कपूर, मलायका, करीना कपूर या कलाकारांनी त्यांच्या अभिनयासह नृत्याविष्याकाराने सुद्धा अनेकांना भुरळ पाडली.

‘ढोलना ते छैया छैया’पर्यंत बॉलीवूड कलाकारांची अनेक गाणी सोशल मीडियावर कायम ट्रेंडिंग असतात. याच लोकप्रिय गाण्यांवर एका पाकिस्तानी अभिनेत्रीने ठेका धरल्याचं व्हायरल व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे.



पाकिस्तानी अभिनेत्री हानिया आमिरने तिची सहकलाकार यशमा गिलच्या बहिणीच्या लग्नात जबरदस्त डान्स केल्याचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. हानिया आणि यशमा या दोघी आरोबा गिलच्या लग्नात अनेक बॉलीवूड गाण्यांवर थिरकताना दिसल्या. माधुरी दीक्षितने २००१ मध्ये म्हणजेच साधारण २४ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या ‘लज्जा’ चित्रपटातील “बडी मुश्किल...” गाण्यावर मनिषा कोइरालाच्या साथीने जबरदस्त डान्स केला. हानिया आणि यशमा या दोघींचीही एनर्जी तसेच नृत्याविष्कार लक्षवेधी ठरला. हानियाने यावेळी हिरव्या आणि सोनेरी रंगाचा भरजरी लेहेंगा घातला होता. माधुरीच्या “बडी मुश्किल...” गाण्याप्रमाणेच हानियाने २००० मध्ये प्रदर्शित झालेल्या संजय दत्त आणि शिल्पा शेट्टी यांच्या ‘जंग’ चित्रपटातील ‘आयला रे लडकी मस्त मस्त...’ या गाण्यावरही डान्स केला. जॅझी बीच्या ‘जीने मेरा दिल लुटिया’ या सुपरहिट गाण्यावर हानिया जमिनीवर बसून जबरदस्त डान्स करताना दिसली. इतकंच नव्हे तर या अभिनेत्रीने कतरिना कैफच्या ‘चिकनी चमेली’ गाण्यावर सुद्धा ठुमके लगावले आहेत.

## १० व्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं १५ ते १९ जानेवारी दरम्यान आयोजन




### भारतीय सिनेमा स्पर्धा

महोत्सवाच्या पाच दिवसांच्या कालावधीत भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. महोत्सवात मागील वर्षाप्रमाणे भारतीय स्पर्धा गटाचा समावेश करण्यात आलेला आहे. यात विविध भारतीय भाषांतील नऊ सिनेमांचा समावेश असून पाच राष्ट्रीय पातळीवरील ज्युरी हे प्रेक्षकांसह चित्रपट पाहणार आहेत. यातील सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपटाला सुवर्ण कैलास पारितोषिक आणि एक लक्ष रूपये देण्यात येणार आहे. तसेच सर्वोत्कृष्ट पटकथा, सर्वोत्कृष्ट कलाकार (स्त्री/पुरुष) या वैयक्तिक पारितोषिकांचा देखील समावेश असणार आहे.

जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठी रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली असून बुधवार, १५ जानेवारी ते रविवार, १९ जानेवारी २०२५ या दरम्यान हा महोत्सव पीव्हीआर-आयनॉक्स थिएटर प्रोझोन मॉल, छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे.

नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण सेंटर व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे.

डेलीहंट डिजीटल पार्टनर आहेत. सॉलीटेअर टॉवर्स हे या महोत्सवाचे सह आयोजक आहेत. एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस या महोत्सवाचे ॲकॅडमीक पार्टनर तर एमजीएम रेडिओ एफएम ९०.८ हे रेडिओ पार्टनर आहेत.




**मेष** – अचूक मार्गदर्शनाने लाभ होईल. सामाजिक कार्यात भाग घ्याल. नोकरी-व्यवसायात दुर्लक्षित मुद्दे ऐरणीवर आणाल.

**वृषभ** – नोकरी-व्यवसायात अधिक मेहनत घ्यावी लागेल. परिस्थितीचा अभ्यासपूर्वक विचार करावा. चिडचिड वाढेल.

**मिथुन** – नोकरी-व्यवसायात वरिष्ठांचा विश्वास संपादन कराल. कामाची पत सुधारेल. कामाचे सुनियोजन कराल.

**कर्क**–सहकारीवर्गाच्या मदतीने मत मांडाल. जोडीदारासह भविष्याचे आराखडे आखाल. वैद्यकीय तपासणी करावी.

**सिंह** – विचारांना योग्य दिशा देणे आवश्यक आहे. इतरांच्या समस्यांना वाचा फोडाल. कुटुंबात शिस्तीला महत्त्व द्याल.

**कन्या** – अधिकाराचा योग्य वापर कराल. जोडीदाराची चांगली साथ मिळेल. नातेवाईकांच्या मदतीला धावून जाल.

**तुळ** – नको तिथे धाडस दाखवू नये. वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. जोडीदारासह सूर जुळतील. खरेदीचा आनंद लुटाल.

**वृश्चिक** – भविष्याचा व्यावहारिक दृष्टिकोनातून विचार कराल. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील. विचारांना स्थिरता हवी.

**धनु** – हितशत्रूंवर वेळीच ताबा मिळवाल. नोकरी-व्यवसायात नवे करार स्वीकाराल. कामानिमित्त प्रवास संभवतो.

**मकर** – कार्याची पूर्तता करण्यासाठी मेहनत घ्याल. सहकारी वर्ग अपेक्षेनुसार वागणार नाही. पर्यायी व्यवस्था तयार ठेवाल.

**कुंभ** -वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. कौटुंबिक वातावरण उत्साही राहील. व्यवस्थितपणाचा अतिरेक करू नका.

**मीन** – आपली कर्तव्ये पार पाडाल. जोडीदाराला चांगली साथ द्याल. काही घरगुती प्रश्न सामोपचाराने सोडवाल.

# सूक्ष्म सिंचन योजनेत निधीचा दुष्काळ

**नाशिक (सचिन कदम)** – ‘प्रति थेंब, अधिक पीक’ सूक्ष्म सिंचन योजनेच्या लाभापासून राज्यातील पावणेदोन लाखहून अधिक शेतकऱ्यांना वंचित रहावे लागले आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडे २०२३-२४ वर्षातील ७१६ कोटींचे अनुदान रखडल्याने ही स्थिती निर्माण झाल्याचे कृषी विभागाचे म्हणणे आहे.

कृषी विभागाच्या एका बैठकीत ही आकडेवारी समजल्यानंतर कृषिमंत्री माणिक कोकाटे यांनी रखडलेल्या अनुदानाचा विषय केंद्रीय कृषिमंत्र्यांसमोर मांडण्याचे संकेत दिले होते. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा नियोजनपूर्वक वापर करून



अधिकतम कृषी उत्पादन मिळवण्यासाठी केंद्र सरकार राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन योजना राबवते. त्या अंतर्गत केंद्राकडून ६० टक्के तर, राज्य सरकारकडून ४० टक्के आर्थिक भार उचलला जातो. सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र वाढविण्याचा योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांत मागेल त्याला ठिबक असा योजनेचा प्रचार झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळाला. प्राप्त झालेले, निकषात बसणारे सर्व अर्जदार योजनेत समाविष्ट झाले.

या योजनेतून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के तर, अन्य शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान मिळते. केंद्राकडून राज्याला २०२३- २०२४ वर्षातील तिसऱ्या व चवथ्या हप्त्याची रक्कम मार्चपासून मिळालेली नाही. परिणामी, एक लाख ७७ हजार शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत आहेत. प्रलंबित असणारी ही रक्कम ७१६ कोटींच्या आसपास आहे. यामध्ये केंद्राकडे सुमारे ४२७ कोटी आणि उर्वरित राज्य सरकारचे असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.

२०२३-२४ वर्षात नाशिक जिल्ह्यात २२६४ लाभार्थ्यांना २.११ कोटींचे अनुदान मिळाले. तर ६८९२ शेतकरी वंचित राहिले. त्यांच्यासाठी १८.३७ कोटींची आवश्यकता आहे. राज्यात ३४ जिल्ह्यांत कमी-अधिक प्रमाणात अशीच स्थिती आहे.

### अंमलबजावणीवर परिणाम

■ ‘प्रति थेंब अधिक पीक’ योजनेच्या २०२३-२४ वर्षातील कोट्यवधींच्या प्रलंबित अनुदानामुळे या योजनेच्या अंमलबजावणीवर परिणाम झाल्याचे कृषी विभागाचे अधिकारी मान्य करतात. निधीअभावी आधीच पावणेदोन लाखहून अधिक शेतकऱ्यांचे अनुदान दिलेले नाही. अशा स्थितीत नव्या अर्जदारांना लाभ कसा देता येईल, असा त्यांचा प्रश्न आहे.

# सुभेदार महेश मनोहर जाधव यांचं माटवणमध्ये जंगी स्वागत

**दापोली (सुचित शिंदे) :** देशाची सेवा बजावण्यासाठी सीमेवर तैनात असलेले दापोली तालुक्यातील सुपुत्र महेश जाधव हे ३१ डिसेंबर रोजी सैन्यातून निवृत्त झाले.सुभेदार पदावर कार्यरत असलेल्या महेश जाधव यांचं दापोली आणि माटवणमध्ये जंगी स्वागत करण्यात आलं.सीमेवर त्यांनी २८ वर्ष देशाची सेवा केली आहे. २७ डिसेंबर १९९६ रोजी ते सैन्यात भरती झाली. देशाच्या विविध सीमेवर त्यांनी सेवा बजावली आहे.

जम्मू काश्मीर सारख्या संवेदनशिल भागात त्यांनी उत्तम कामगिरी करून दाखवली आहे. ३१ डिसेंबर २०२४ रोजी यशस्वी सेवा देऊन ते आपल्या मूळ गावी परतले आहेत. त्यांनी दाखवलेल्या शौर्याप्रती कृतज्ञता म्हणून खेड रेल्वे स्टेशन, दापोली आणि माटवणमध्ये त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. हा वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जी. एन. पाटील (माजी मुख्याध्यापक माटवण हायस्कूल), श्रीराम महाडिक (सेक्रेटरी श्रीराम शिक्षण संस्था माटवण), शुभ्रा सावंत



(पोलीस पाटील माटवण), विलास जाधव (अध्यक्ष, कोंथळ कोंड), ज्येष्ठ माजी सैनिक सखाराम चव्हाण, गोविंद पवार, अजित मोरे, संतोष महाडिक (प्रतिष्ठित नागरिक नवानगर), महेश शेलार (प्रतिष्ठित नागरिक भानगर), माजी सैनिक अनिल कदम, दापोली आजी-माजी सैनिक संघटना दापोलीचे अध्यक्ष सईद देशमुख, उपाध्यक्ष सुरेश जाधव, सचिव सुदेश चिपळूणकर, संदीप यादव, सहसचिव सुनील इदाते व माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी, सर्व सभासद, जाधव यांचे कुटुंबीय आणि ग्रामस्थ यांची विशेष उपस्थिती होती.

SPORT

# Rohit To Lead; Shami Returns, No Jaiswal And Samson: India's Likely Squad For Champions Trophy 2025

**NEW DELHI :** After India's long tour of Australia finished on Sunday (January 5), there are big changes in the Test team pending, but they will have to wait as the focus will shift to ODI cricket with the deadline to announce the squad for the 2025 Champions Trophy (CT) just a week away. India faces a tough challenge in picking the team as they played just three ODIs in 2024. While the team is largely settled in the format, there is no recent form to pick from. The Men in Blue will play three ODIs against England at home in February, but that will be after the squad selection deadline. It is expected that BCCI will name the squad for the bilateral series and the mega event at the same time with no major changes.

Despite his poor form in Test cricket and him not playing the Sydney Test, Rohit Sharma will lead the team in the Champions Trophy. Similarly, Virat Kohli's nightmare form in red-ball cricket should not affect his place in ODI cricket, where no player in history has more centuries than him.

Although Yashasvi Jaiswal has already cemented himself among the best batters in world cricket in Tests and T20Is, he is yet to make his ODI debut, and a place in the squad for the mega event looks unlikely. Shubman Gill should retain his spot as Rohit Sharma's opening partner. The 25-year-old has a terrific record in the 50-over format with a batting average of 58.2.

Shreyas Iyer might not be in India's scheme of things in the other two formats, but his performances in ODI cricket are hard to ignore. The 30-year-old has cemented his spot at number four. India faces a tough dilemma in picking their two wicketkeeper batters with a fight between KL Rahul, Rishabh Pant, and Sanju Samson for the spot. Although Samson scored a century in the last ODI he played, he was not part of the squad for the Sri Lanka series in August. The 30-year-old is not playing in the Vijay Hazare Trophy (VHT), which could have given him the chance to prove his credentials in the 50-over format. As incumbents, Rahul and Pant should retain their spot in the squad. Hardik Pandya has not played any ODI cricket since his injury in the 2023 Cricket World Cup, but the star all-rounder is playing the VHT, and when fit, he is an irreplaceable asset for the Men in Blue in white-ball cricket. The team will be wary of a need to have a backup ready for Hardik, and after his impressive T20I and Test debuts, a place in the ODI team should follow for Nitish Kumar Reddy.



Although Kuldeep Yadav is under a fitness cloud after undergoing surgery recently, he is expected to be the team's first-choice wrist spinner. If the 30-year-old is not fit, a call-up for Ravi Bishnoi should follow.

Two among Ravindra Jadeja, Axar Patel, and Washington Sundar are set to be named in the squad. Sundar's return to the Test team shows the team management's faith in him, while Jadeja could get the nod over Axar, as two left-arm spinners are unlikely.

Jasprit Bumrah, Mohammed Shami, and Mohammed Siraj dominated the 2023 World Cup, and the trio are set for a reunion in the UAE if all three are fit. Shami has not played for India since November last year, but he has proven his fitness in domestic cricket across formats over the last two months.

Arshdeep Singh is India's most successful pacer in T20Is and was part of the ODI squad in the last two assignments. The presence of a left-arm pacer will add more variety to the Indian attack.12th January is the deadline to announce the squad. India will play their first match in the tournament against Bangladesh on February 20 before facing Pakistan and New Zealand on February 23 and March 2. All matches of Rohit-led side will take place at the Dubai International Stadium. India Likely Squad For Champions Trophy 2025: Rohit Sharma (C), Shubman Gill, Virat Kohli, Shreyas Iyer, KL Rahul (WK), Rishabh Pant (WK), Hardik Pandya, Nitish Kumar Reddy, Ravindra Jadeja, Washington Sundar, Kuldeep Yadav (if fit)/Ravi Bishnoi, Jasprit Bumrah, Mohammed Shami, Mohammed Siraj, and Arshdeep Singh

## Why Cricket Australia Didn't Call Sunil Gavaskar During The Border-Gavaskar Trophy Presentation

**NEW DELHI :**Cricket Australia has finally clarified why they didn't call former India cricketer Sunil Gavaskar to hand the Border-Gavaskar Trophy to Pat Cummins besides Allan Border. Gavaskar on Sunday, January 5 expressed his displeasure after not being invited to present the trophy, named after him and Border, to Australia following their victory over India in the high-voltage five-match rubber.Australia reclaimed the Border-Gavaskar trophy after a decade with a six-wicket victory over India in the fifth and final Test. Australia reclaimed the Border-Gavaskar trophy after a decade with a six-wicket victory over India in the fifth and final Test.



Border presented the trophy to the home side but Gavaskar, despite being at the venue at the same time, was ignored, raising a huge hue and cry among Indian cricket fans."We acknowledge it would have been preferable if both AB and Sunil had been asked to go on stage. The plan was that if India won Sunil would present and Allan Border would present to Australia," a Cricket Australia official told Cricbuzz.

Gavaskar was left extremely disappointed by the situation and didn't hide his emotions while speaking on live television after the match."I certainly would have loved to have been there for the presentation. After all, it is the Border-Gavaskar Trophy and it is about Australia and India," Gavaskar was quoted as saying by The Code Sports. "I mean, I am here on the ground. To me, it should not matter that Australia won when it comes to the presentation. They played better cricket so they won. That's fine," Gavaskar added.Had the Indian side won the trophy, the former India cricketer would have been invited to present it to the victorious team. CA later confirmed that Gavaskar was aware he would have presented the award to Indian skipper Jasprit Bumrah if the visitors had won the Sydney Test and retained the trophy.

## Comeback king Alexandre Muller ends Kei Nishikori's fairytale to lift Hong Kong Open title

**NEW DELHI:** French professional tennis player Alexandre Muller claimed his first ATP Tour title by defeating Kei Nishikori in the final of the Hong Kong Open on Sunday. The match lasted 1 hour and 43 minutes, with Muller overcoming a slow start to win 2-6, 6-1, 6-3.Nishikori, a 35-year-old Japanese player, started strongly by winning the first set in just 33 minutes. However, Muller regained his composure and won the next two sets convincingly. This victory marked Muller's first ATP Tour title and a significant milestone in his career.Notably, Muller became only the third player to win a tour-level title after losing the opening set in every match he played during the tournament, showcasing his resilience and determination. In his post-match speech, Muller expressed his gratitude to the crowd for their support and acknowledged the incredible week he had, despite losing the first set in all his matches."It's been an amazing week for me, losing the first set in all the matches," he added. "I have no words, I'm sorry, I just won the match, but thank you everyone."He also praised Nishikori, describing him as an amazing player and wishing him luck for the rest of the season.For Nishikori, the Hong Kong Open final was his 27th tour-level final and his first since winning in Brisbane in 2019.The former world number four has been battling injuries, including a major hip surgery, and his run to the final in Hong Kong marked a significant step in his comeback journey. Nishikori's performance in Hong Kong, which included victories over seeded players like Karen Khachanov, Cameron Norrie, and Denis Shapovalov, will see him return to the top 100 in the world rankings for the first time since June 2022.



## Bumrah's injury could be lot worse than imagined after India pacer refuses to take field, Ponting says ‘It's a real worry’

**NEW DELHI :** India stand-in captain Jasprit Bumrah did not take the field on Day 3 of the ongoing fifth and final Test match of the Border-Gavaskar Trophy series after the Indian camp claimed that the fast bowler was suffering from 'back spasms'. However, speculations are rife that the injury could be a lot worse than the Indian team claimed, as former Australia captain Ricky Ponting said that the 'back spasms' claim was a smokescreen



Bumrah had left the ground on Day 2 of the match and was taken to the hospital by an ambulance, as reports emerged that he was taken for a scan. However, a senior journalist, Peter Lalor, revealed on Sunday morning that Bumrah went to the hospital to get an injection as a scanning machine was available to the Indian team at the SCG. "My mail is he didn't go for a scan," Lalor told Channel 7. "They have scanning machines in the dressing rooms. He went for an injection. Probably Cortisone."

Bumrah had undergone surgery back in 2023 for a stress fracture in his back and hence India would be extra cautious with the current concern withy the Champions Trophy a month later. "He had a back spasm," teammate Prasidh Krishna told reporters at the end of Day 2 in Sydney. "He has gone for scans so the medical team is monitoring. We'll know (whether he will keep playing) when the medical team gets back to us."

As Bumrah did not even bowl during the warm-up on Day 3 in Sydney, Ponting suggested that the Indian camp were probably not entirely truthful about his injury. "It seemed like a real worry for me," Ponting said on Channel 7. "They said back spasms when he got back (to the SCG).

"[But] he's running up the stairs. He ran off the field. That's not signs or symptoms of back spasms. I will keep my fingers crossed and hope it is. I would love to see him take further part in this game and not be out for an extended period of time again like he was with the stress fractures a couple of years ago.".

## दुचाकीस्वार महिलेकडून महिला पोलिसाला धक्काबुक्की

● पुणे, सुचिता देशमुख :



दुचाकीस्वार महिलेने वाहतूक नियमन करणाऱ्या महिला पोलिसाला शिवीगाळ करुन धक्काबुक्की केल्याची घटना वारजे भागात घडली. याप्रकरणी वारजे पोलिसांनी दुचाकीस्वार महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत वारजे वाहतूक विभागातील पोलीस शिपाई ऋतुजा तांबे यांनी वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एका दुचाकीस्वार महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वारजे भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात वाहतूक शाखेतील पोलीस शिपाई ऋतुजा तांबे दोन दिवसांपूर्वी सायंकाळी वाहतूक नियमन करत होत्या. त्यावेळी दुचाकीस्वार महिलेने वाहतूक नियमांचा भंग केला. विरुद्ध दिशेने निघालेल्या दुचाकीस्वार महिलेला पोलीस शिपाई तांबे यांनी अडवले. दुचाकीस्वार महिलेवर कारवाई करताना तिने पोलीस शिपाई तांबे यांना शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली. तांबे यांनी सहकारी महिला पोलीस शिपाई चव्हाण यांना घटनेची माहिती दिली. पोलीस शिपाई चव्हाण तेथे आल्या. तेव्हा तांबे आणि चव्हाण यांना शिवीगाळ करुन दुचाकीस्वार महिलेने पुन्हा धक्काबुक्की केली. झटापट करुन दुचाकीस्वार महिला पसार झाली. पोलीस उपनिरीक्षक पवार तपास करत आहेत.

# सक्षम भारतीय स्त्री हाच भारताचा खरा दागिना - अमृता फडणवीस

● मुंबई, विशाल कारंडे :

भारतीय सक्षम आणि समर्थ स्त्री हाच भारताचा खरा दागिना आहे असे प्रतिपादन प्रसिद्ध बँकिंग तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या अमृता फडणवीस यांनी केले. जीजेईपीसी आयोजित १७ व्या आयआयजेएस एक्झीबिशनचे उद्घाटन मुंबईतील बॉम्बे एक्झीबिशन सेंटर येथे पार पडले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अमृता फडणवीस यांनी भूषवले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र उद्योग विकास आयुक्त देवेंद्रसिंह खुशवाह, भारतीय उद्योग आणि व्यापार खात्याचे संचालक आर. अरुलानंदन, सेन्को गोल्ड अँड डायमंडचे व्यवस्थापकीय संचालक सुवंकर सेन उपस्थित होते. ७ जानेवारी पर्यंत चालणाऱ्या या एक्झीबिशनमध्ये देश - विदेशातून तब्बल ३२०० विक्रेते भाग घेतला आहे.

या कार्यक्रमा प्रसंगी बोलताना अमृता फडणवीस यांनी जीजेईपीएस कडून दागिने निर्मिती क्षेत्रातील काम करणाऱ्या महिलांच्या सक्षमी करण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचे कौतुक केले. दागिने निर्मिती हे क्षेत्रच असे आहे की ज्या मध्ये भारतीय स्त्रिया याच




सर्वात महत्वाचा घटक आहेत. त्यांच्या सक्षमीकरणाशिवाय या क्षेत्राला आणि पर्यायाने देशाला विकसित होत येणार नाही. त्यामुळे सरकारने तसेच या प्रमुख व्यावसायिकांच्या संघटनांनी या विषयाकडे लक्ष दिले पाहिजे असे मत अमृता फडणवीस यांनी मांडले.

दागिने निर्मिती क्षेत्र हे भारताच्या एकूण निर्यातक्षम क्षेत्रातील एक प्रमुख क्षेत्र आहे त्यामुळे या क्षेत्राच्या विकासाने देशाला मोठा फायदाच होणार आहे असे मत भारतीय उद्योग आणि व्यापार खात्याचे संचालक आर अरुलानंदन यांनी मांडले.

■ महाराष्ट्र हे देशातील दागिने निर्मिती क्षेत्राचे हृदय आहे. त्यामुळे महाराष्ट्रात या क्षेत्राला आवश्यक असणाऱ्या सर्वच पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी महाराष्ट्र सरकार कायमच तत्पर राहील असा विश्वास महाराष्ट्र उद्योग विकास आयुक्त देवेंद्रसिंह खुशवाह यांनी व्यक्त केला.

■ भारतातील एकूणच निर्मिती क्षेत्राला आपल्या गुणवत्तेवर आणि उद्योजकता वाढीवर लक्ष केंद्रित करावे लागेल आणि त्या गोष्टींमुळेच भारतीय निर्मिती क्षेत्र हे जागतिक बाजारपेठ काबीज करू शकेल आणि जीजेईपीसी यांच्याकडून या करिता केले जाणारे प्रयत्न प्रशंसनीय आहेत असे मत सेन्को गोल्ड अँड डायमंडचे व्यवस्थापकीय संचालक सुवंकर सेन यांनी मांडले. जीजेईपीसी कडून अशा मोठ्या प्रमाणावर केल्या जाणाऱ्या प्रयत्नांमुळे भारतातील दागिने निर्मिती क्षेत्राला नवीन झळाळी प्राप्त होईल आणि भविष्यात जागतिक बाजारपेठांमध्ये भारतीय दागिने निर्मिती क्षेत्राचे नाव उजळून निघेल असे मत सर्वच मान्यवरांनी व्यक्त केले.

## निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी, रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी कार्यशाळा - सहसंचालक विजू शिरसाठ

● रत्नागिरी, दिगंबर जाधव:

**राज्यात निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी, रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी आणि डीस्ट्रीक्ट अॅब्ज एक्सपोर्ट हब उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी निर्यात प्रचालन कार्यशाळेचे आयोजन केल्याचे कोकण विभागाच्या उद्योग सहसंचालक विजू शिरसाठ यांनी सांगितले.**




अल्पबचत सभागृह येथे आज जिल्हा उद्योग केंद्रामार्फत आयोजित निर्यात प्रचालन कार्यशाळेचे उद्घाटन झाले. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी सीमा शुल्क विभागाचे अधीक्षक अतुल गायकवाड, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अजिंक्य आजगेकर, इंडिया पोस्टचे गजानन करमरकर, बँक ऑफ बडोदाचे चीफ मॅनेजर सुधीर प्रजापती, फेडरेशन ऑफ रत्नागिरी डिस्टीक चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष डॉ. प्रशांत पटवर्धन, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू सावंत, लोटे परशुराम इंडस्ट्रीजड. राज आंब्रे, संचालक शिरीष चौधरी, एमपीडीएचे उपसंचालक गिबिन कुमार, मत्सविभागाचे सहाय्यक आयुक्त आनंद पालव,आदी उपस्थित होते.

श्रीमती शिरसाठ म्हणाल्या, असोसिएशन, उद्योजक यांच्यासोबत बँकर्स आणि शासकीय अधिकारी हे एकमेकांमध्ये समन्वय साधत चांगल काम करत आहे, चांगला प्रतिसाद देत आहेत. उद्योग मंत्री उदय सामंत आणि विभागाचे प्रधान सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योग विभागाने मागील दोन वर्षात मोठ्या प्रमाणावर काम करत उत्तुंग भरारी घेऊन विविध योजनांमध्ये मोठी कामगिरी केली आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर काम झाले आहे.

■ निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी उद्योजकांना इन्फ्रास्टक्चर, स्टँप ड्यूटी, वीज बील आदी बाबींवर देण्यात येणाऱ्या इन्सेटीव्हीची माहिती त्यांनी दिली. उद्योजकांना कोणतीही अडचण असेल तर त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा, शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ सर्व उद्योजकांनी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जिल्ह्यातील उद्योजक, नवउद्योजक यांना जिल्हा उद्योग केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सुविधा, त्यांच्यासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, शासनाच्या विविध योजनांची माहिती श्रीमती शिरसाठ यांनी यावेळी दिली.

■ कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्ज्वलन करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाव्यवस्थापक श्री. आजगेकर यांनी तर सूत्रसंचालन पूर्वा पेठे आणि संकेत कदम यांनी केले. कार्यशाळेला उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना प्रक्रिया उत्पादक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाळ होत नसल्यानेच उच्चशिक्षित महिलेने चक्क केली बाळाची चोरी

● नाशिक, सचिन कदम :

नाशिक जिल्हा रुग्णालय विविध कारणांनी नेहमीच चर्चेत असते. मात्र जिल्हा रुग्णालय आता एक वेगळ्या प्रकरणाने पुन्हा चर्चेत आले आहे. रुग्णालयातून शनिवारी पाच दिवसांचे बाळ चोरी झाल्याची घटना घडली. यामुळे संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली. नाशिक जिल्हा रुग्णालयात सुमन खान या महिलेची प्रसूती झाली. मात्र त्यानंतर या महिलेवर सपना मराठे नामक महिलेने दोन दिवसांपासून रेकी केली आणि




खान दाम्पत्याचा विश्वास संपादन केला. सपना मराठे ही महिला या खान दाम्पत्यासोबतच जिल्हा रुग्णालयात राहत होती. बाळाला सांभाळते असे सांगून शानिवारी दुपारी ती महिला नवजात बाळ घेऊन पसार झाली. बाळाच्या नातेवाईकांनी बाळाची शोधाशोध सुरू केली आणि तात्काळ जिल्हा रुग्णालयाने या संबंधित घटनेची माहिती पोलिसांना दिली. आता पोलीस तपासात या प्रकरणी धक्कादायक माहिती समोर आली आहे.नाशिक जिल्हा रुग्णालयात पाच दिवसांचे बाळ हरवल्याची फिर्याद अब्दुल खान यांनी सरकारवाडा पोलीस ठाण्यात दिली. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ विविध पथके रवाना केली. नाशिक जिल्ह्यातील निफाड आणि इतर परिसरात पोलिसांची शोधाशोध सुरू होती. पंचवटी येथील एका खासगी रुग्णालयात एक महिला लहान बाळाला घेऊन आल्याची माहिती त्यांना मिळाली. पोलिसांनी या महिलेची माहिती घेतली असता ही तीच महिला असल्याची पोलिसांना खात्री झाली. सपना मराठे ही महिला धुळे जिल्ह्यातील असल्याचं समोर आलं आणि पोलिसांनी तपासाची चक्र फिरवले. बाळ चोरी करणाऱ्या महिलेला नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी शहरात पोलिसांना मिळून आली. महिलेला पोलिसांनी ताब्यात घेत सखोल चौकशी केली असता बाळ चोरी का केली हे सांगताना महिलेने सांगितलेली हकीगत बघून पोलीस देखील काही काळ चक्रावले. बाळ होत नसल्याने ही महिला नाशिक जिल्हा रुग्णालयात आली आणि नवजात बाळ चोरी करण्याचे ठरवले.

## खालापूर पोलिसांकडून रेझिंग डे निमित्त महिला बाल सुरक्षा वाहतूक नियमन, सायबर क्राईम जनजागृती

**कोणतीही समस्या आल्यास तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधा - पोलीस निरीक्षक सचिन पवार यांचे विद्यार्थ्यांना आव्हान**

● खोपोली, विवेक गुंजाळ :

४ जानेवारी रोजी पहल नर्चरिंग लाईव्स कौशल्य प्रशिक्षण केंद्र खालापूर व स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल गोरठण बुद्रुक याठिकाणी खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस उपनिरीक्षक अलोक खिसमतराव, पोलीस हवालदार सतीश जगधने, महिला पोलीस हवालदार कीर्ती कांबळे, गोपनीय विभागाचे दिनेश भोईर - समीर पवार, पोलीस स्टाफ गणेश चौधरी व रुपाली शिंदे आदीनी रेझिंग डे निमित्त महिला



बाल सुरक्षा वाहतूक नियमन, सायबर क्राईम जनजागृती करीत विद्यार्थ्यांशी व शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी महिला व बालक सुरक्षा, वाहतुक नियमन, सायबर क्राईम गुन्हे व ते घडु नयेत याबाबत घ्यावयाची दक्षता याबाबत माहिती दिली. तसेच उपस्थित विदयार्थी व शिक्षकांना डायल ११२, पोलीस काका, पोलीस दिदी यांचे संपर्क क्रमांक देण्यात आले असुन सायबर क्राईम हेल्पलाईन नंबर, वेबसाईट बाबत माहिती देण्यात आली. व त्यांना येणा-या तक्रारी - समस्यांबाबत चर्चा करण्यात आली असून पोलीस ठाणेकडे असलेल्या शस्त्रांची ओळख करून देण्यात आली.२ जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात पोलीस स्थापना दिवस म्हणुन साजरा केला जातो.

## नियोजन प्राधिकरणांचे काम आता कंपनीच्या धर्तीवर



● मुंबई, राकेश गायकवाड :

'राज्यातील विविध नियोजन प्राधिकरणांचे सक्षमीकरण करुन, त्यांचे कामकाज कंपनीच्या धर्तीवर करावे,'' अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवार, दि. ४ जानेवारी रोजी दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी नगरविकास विभागाच्या आगामी १०० दिवसांच्या कामकाज नियोजनाबाबत बैठक झाली. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या. सह्याद्री राज्य अतिथी गृह येथे झालेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राज्यमंत्री पंकज भोयर आदी उपस्थित होते. नगरविकास विभाग(एक)चे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता यांनी विभागाचे सादरीकरण केले. त्यांनी सादरीकरणातून नगरविकास विभागाच्या अखत्यारीत असलेले विविध नियोजन प्राधिकरण यांचे सक्षमीकरण करणे, शहरांजवळील सुमारे साडेतीन हजार गावांत रस्ते विकासाचे नियोजन करणे, राज्यातील दहा लाखांवरील शहरांत 'नागरी संकल्प प्रकल्प' राबविणे, इमारत परवाने देण्याच्या प्रक्रियेचे संगणकीकरण करणे, पर्यटन धोरणानुसार एकत्रित नागरी विकास आणि नियंत्रण नियमावलीत बदल करण्याबाबतची माहिती दिली.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, राज्यातील शहरांच्या विकासासाठी निधी खर्च करण्याची आवश्यकता आहे. शहरातील पायाभूत विकासासाठी भांडवली गुंतवणूक करावीच लागणार आहे. मात्र, यासाठी निधी उभारण्यासाठी नाविन्यपूर्ण आर्थिक पर्याय उभारले पाहिजेत, अशा सूचना दिल्या. सोलापूर स्मार्ट सिटीच्या 'पाणीपुरवठा योजने'च्या निधीसाठीच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात यावी. यामुळे सोलापूरवासीयांच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघेल, असे सांगितले.

### सिंगल स्क्रीन चित्रपटगृहांना सवलत मिळणार

■ राज्यातील प्रत्येक शहरात चित्रपटांसाठीची थिएटरची संख्या वाढण्याची गरज आहे. यासाठी सध्या असलेल्या सिंगल स्क्रीन थिएटरना काही सवलती देता येईल का, तसेच मराठी नाटक आणि चित्रपट एकाच थिएटरमध्ये दाखवता येईल का याबाबत विचार करावा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

## वर्सोवा-दहिसर कोस्टल रोडचे काम लवकरच सुरू करणार : पीयूष गोयल

● मुंबई, विशाल पाटील :

वर्सोवा-दहिसर सागरी किनारा मार्गासाठी (कोस्टल रोड) प्रकल्पाला गती देण्यासाठी येत्या ४५ दिवसांत सर्व परवानग्या मिळतील, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी शनिवारी दिली. त्यानंतर तातडीने या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई उत्तरमधील अनेक पायाभूत प्रकल्पाच्या सविस्तर चर्चेसाठी खासदार पीयूष गोयल यांनी शनिवारी पालिका मुख्यालयात बैठक घेतली. यावेळी त्यांनी या प्रकल्पासंदर्भात माहिती दिली.केंद्र सरकारकडून सागरीकिनारा व्यवस्थापन क्षेत्राची, तसेच पर्यावरण मंत्रालयाची परवानगी मिळाली आहे. तरीही, या मार्गातील खारफुटी हटवण्यासाठी अद्याप केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाची परवानगी मिळणे बाकी आहे. त्यानंतर त्याची माहिती उच्च न्यायालयात सादर करून मंजुरी मिळवावी लागणार आहे, असे ते म्हणाले. वर्सोवा ते दहिसरमधील प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी कोस्टल रोडच्या बांधकामाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पालिकेने हाती घेतला आहे.वर्सोवा ते दहिसर कोस्टल रोडचे काम एकूण सहा पॅकेजमध्ये चालणार असून, त्यासाठी चार बड्या कंत्राटदारांची निवड झाली आहे. या चारही कंपन्या सध्या मुंबईत बांधकामे सुरू असलेल्या अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये सहभागी आहेत. एक वर्षापूर्वी या कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत. मात्र, मंजुऱ्यांअभावी हा प्रकल्प रखडला आहे. मात्र, लवकरच या परवानग्या मिळवून कामाला सुरुवात केली जाईल, अशी माहिती गोयल यांनी दिली.



आगामी महापालिका निवडणुकांमध्ये उत्तर मुंबई विभागातून महायुतीचे ४० नगरसेवक जिंकून आणणार, असा दावा केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी केला.